# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१५/ २०१५** **दिनांक १८.०८.२०१५**

**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर** **वेळ- सायंकाळी ०६.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक १८.०८.२०१५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ २८४६/ २०१५, दिनांक १८ ऑगष्ट, २०१५ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक १८.०८.२०१५ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री. विनय जोशी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष
०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य
०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

उपस्थितीची नोंद घेण्यात येऊन, विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.०१** **दिनांक ०६.०८.२०१५ रोजी अहमदनगर येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.२५१** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

---

**विषय नं.०२** **फायर ॲण्ड सेप्टी विभागाकडील अग्नीशमन वाहनाकरीता साहित्य खरेदीकामी उघडण्यात आलेल्या ई-निविदामधील निम्नतम दरधारकास पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अधिनियम २००४ मधील तरतुदः-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमूद आहे.

**प्रस्ताविक:-** फायर ॲण्ड सेफ्टी विभागाचे अग्निशमन वाहनासाठी आवश्यक असलेले साहित्य खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु.७,००,०००/- (अक्षरी रु.सात लाख,) मात्रचे खर्चास मा.उप समिती सभा दि.१६.०६.२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १६२ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.२९.०७.२०१५ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

निर्णय क्र.१६२ नुसार फायर टेंडर व आपत्कालीन वापरासाठी खालील आवश्यक साहीत्यांपैकी महाराष्ट्र शासनाचे रेट कॉन्ट्रक्ट मध्ये उपलब्ध असलेले साहीत्य शासकिय दराने खेरदी करणेत यावे व उर्वरीत साहीत्य खरेदी करणेकामी वर्तमान पत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करुन साहीत्य खरेदी करणे कामी रु.७,००,०००/- (अक्षरी रु.सात लाख) खर्चास मा.उपसमितीचे सभेची मान्यता मिळालेली आहे.

**परिशिष्ट अ. आर.सी.रेट मधील उपलब्ध वस्तु व दर**

| अ.नं. | फायर साहित्य ( आय.एस.आय.मार्क) | वर्णन / IS कोड नं. | नग | प्रति युनिटदर | एकुण दर |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | रिव्हॉल्व्हींग उईथ रिव्हॉल्व्हींग हेड ब्रँच | IS 906 :1988 | ०१ | ६५००/- | ६५००/- |
| ०२ | ट्रिपल परपज हॅंड कंट्रोल ब्रँच | IS - 5131 | ०१ | १९२००/- | १९२००/- |
| ०३ | डिव्हायडींग ब्रिचिंग हॅंड कंट्रोल ब्रँच | IS – 5131: 2002 | ०१ | ८५००/- | ८५००/- |
| ०४ | कलेटींग ब्रिचिंग | IS – 905 : 1980 | ०१ | ६२००/- | ६२००/- |
| ०५ | एफ बी ५ x उईथ पिक अप टयुब (फोम ब्रॉच ) | IS - 2097 :1983 | ०२ | ५०००/- | १०,०००/- |
| ०६ | रबर होज रॅम्प् टु वे विस टन कपॅसिटी | -- | जोडी | १०५००/- | १०,५००/- |
| ०७ | सक्शन होज ८ फुट ४ इंच १०० M.M. रबर | IS 3549 :1983 | ०2 | १४५६५/- | २९,१३०/- |
| ०८ | सक्शन कलेटींग हेड द्वु- वे | IS – 904 : 1984 | ०१ | ८६००/- | ८६००/- |
| ०९ | सक्शन रिंचेस युनिर्व्हसल | IS – 4643 : 1984 | जोडी | १२००/- | १२००/- |
| १० | मेटल स्ट्रेनर (सक्शन स्ट्रेनर सिलेंड्रीकल टाईप) | IS – 907 : 1984 | ०१ | ७२८०/- | ७२८०/- |
| ११ | नोजल स्पॅनर आय एस स्टॅंडर्ड | -- | ०२ | ४३२/- | ८६४/- |
| १२ | रबर हॅंड ग्लोज १४ इंची | IS - 4770 :1991 | १० जोडी | ३७०/-जोडी | ३७००/- |
| १३ | कॅनव्हॉस बकेट | -- | ०१ | ३६०/- | ३६०/- |
| | **आपत्कालीन परीस्थीतीत अग्निशमन वाहनावर वापरावयाचे साहीत्य ( आय.एस.आय.मार्क)** | | | | |
| १४ | हायड्रोलिक कटर मॅन्युअली ऑपरेटेड ( हॅंड ऑपरेटेड कॉम्बीनेशन टुल्स) | SPS 260 H | ०१ | १,९९,०००/- | १,९९,०००/- |
| १५ | चैन सॉ ( वुड कटर ) | STIHL MS 361 OR EQUI. पेट्रोल २२ इंच | ०१ | १,३०,०००/- | १,३०,०००/- |
| | | **आर सी रेट प्रमाणे वस्तु खरेदी साठी होणारी एकूण रक्कम रु.** | | | **४,४१,०३४ /-** |

अक्षरी रुपये - चार लाख एक्केचाळीस हजार चौतीस मात्र.

अ. परिशिष्टातील प्रमाणे महाराष्ट्र शासनाचे रेट कॉन्ट्रक्ट मधील पुरवठाधारक **१.मे.शहा भोगीलाल जेठालाल अॅण्ड ब्रदर्स,अहमदाबाद यांना तसेच अ.नं. ०१ ते १३ बाबत तसेच २. मे.सोलोरॉय इंजिनीयर्स प्रा.लि मुंबई यांना अ.नं. १४ व १५ बाबत दि.२७.०६.२०१५ रोजी कार्यादेश देण्यात आलेला आहे.**

तसेच रेट कॉन्ट्रक्ट मध्ये उपलब्ध नसलेले खालील साहीत्यांबाबत दि.०९.०७.२०१५ रोजीचे वृत्तपत्रात तसेच संस्थानचे संकेतस्थळावर जाहीरात प्रसिध्द करून दि.२५.०७.२०१५ अखेर निवीदा मागविणेत आल्या होत्या.त्यानुसार दि.३०.०७.२०१५ रोजी टेक्नीकल बिड ओपन करण्यात येवून पात्र असलेल्या निविदा दि.०१.०८.२०१५ रोजी (कमर्शियल बिड) उघडण्यात आले.

**परिशिष्ट ब.** ई- निवीदेतील दराचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | साहीत्य | संख्या | परीनाम | के.व्हि. फायर | एशियन सेल्स नाशिक | युनियन ट्रेडींग नाशिक | श्री दिपक एक्सपोर्ट | देवी फायर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1.0 | शॉर्ट ब्रँच IS – 903 | 2.00 | नग | 0.00 | 2425.00 | 2700.00 | 0.00 | **1680.00** |
| 2.0 | फॉग नोजल ब्रँच IS 952 :1986 | 1.00 | नग | 0.00 | 11500.00 | 10900.00 | 0.00 | **6300.00** |
| 3.0 | लंडन पॅर्टन हॅंड कंट्रोल ब्रँच 63 MM GUN METAL LTB-II | 1.00 | नग | 0.00 | 12000.00 | 12150.00 | 0.00 | **5460.00** |
| 4.0 | एलबो फॉर नोझल ब्रँच IS – STANDARD CODE | 1.00 | नग | 0.00 | 300000.00 | 305000.00 | 0.00 | **6500.00** |
| 5.0 | ऑईल फायर नोजल ब्रँचGM 55304 STANDERD CODE | 1.00 | नग | 0.00 | 1250000.00 | 127000.00 | 0.00 | **4900.00** |
| 6.0 | डिलिव्हरी होज RRL टाईप- A ISI 636 लांबी १५ मिटर ६३ mm डाया मिटर IS 903 :1975 | 20.00 | नग | 0.00 | 6150.00 | 5975.00 | 0.00 | **4480.00** |
| 7.0 | फोम कंपाऊंड AFFF 3% | 500 | लि. | **75.18** | 103.00 | 116.00 | 0.00 | 140.00 |
| 8.0 | बास्केट स्ट्रेनर सिलेंड्रीकल टाईप IS - 2930 | 1.00 | नग | 0.00 | 200000.00 | 225000.00 | 0.00 | **560.00** |
| 9.0 | सक्शन होज फिमेल राऊंड थेडेड कपलींग Blank cap | 1.00 | नग | 0.00 | 4600.00 | 4530.00 | 0.00 | **1820.00** |
| 10.0 | कॉल बेल इलेक्ट्रीकल fire bell IS-928 | 1.00 | नग | 0.00 | 30000.00 | 31528.00 | 0.00 | **3500.00** |
| 11.0 | एक्स | 2.00 | नग | 0.00 | 1260.00 | 1150.00 | 0.00 | **700.00** |
| 12.0 | पीक एक्स | 2.00 | नग | 0.00 | 360.00 | **350.00** | 0.00 | 3500.00 |
| 13.0 | पावडे | 2.00 | नग | 0.00 | **200.00** | 240.00 | 0.00 | 700.00 |
| 14.0 | शॉवेल | 2.00 | नग | 0.00 | **470.00** | 480.00 | 0.00 | 1120.00 |
| 15.0 | घमीले | 2.00 | नग | 0.00 | 210.00 | **200.00** | 0.00 | 1120.00 |
| 16.0 | स्नेक टॉग Lucky Reptile Snake Tongs 66 cm | 1.00 | नग | 0.00 | **5890.00** | 6050.00 | 0.00 | 6300.00 |
| 17.0 | बी.ए सेट S.C.O.C.(30 बार क्षमता ,कार्बन कंपोजेट सिलेंडरसह ) ट्रॅगर कं. BS/EN 136, 137, 139/93 OR ISO 9001 | 1.00 | नग | 0.00 | **122000.00** | 128000.00 | 0.00 | 975000.00 |
| 18.0 | बी.ए सेट सिलेंडर ४५ बार क्षमता कार्बन कंपोजेट | 1.00 | नग | 0.00 | 59000.00 | **54300.00** | 0.00 | 975000.00 |
| 19.0 | लाईफ बायोंन्सी | 2.00 | नग | 0.00 | 3400.00 | 3262.00 | 0.00 | **2310.00** |
| 20.0 | लाईफ जॅकेट फुल साईज ( जॅकेट टाईप ) | 2.00 | नग | 0.00 | 2350.00 | 2420.00 | 0.00 | **1470.00** |
| 21.0 | फायर नॉमेक्स सुट CE EN469/EN340 | 1.00 | नग | 0.00 | 63200.00 | 59000.00 | 62000.00 | **56000.00** |
| | | | एकूण रक्कम | **37590/-** | **129230/-** | **55400/-** | ——— | **186960/-** |

**मागणी:-** तरी परिशिष्ट ब मधील न्यूनतम दरधारक अनुक्रमे अ) **मे. के.व्हि.फायर केमीकल्स इंडीया प्रा.लि., मुंबई यांना अ.नं. ७, साठी** ब) **मे. एशियन सेल्स, नाशिक यांना अ.नं. १३,१४, १६ व १७ साठी** क) **युनियन ट्रेडींग यांना अ.नं.१२,१५ व १८ साठी** ड) **देवी फायर, सोलापूर यांना अ.नं.१,२,३,४,५,६,८,९,१०,११,१९,२० व २१ साठी संबंधीतांना पुरवठा आदेश देणेकामी रु. ४,०९,१८०/- इतका खर्च येत आहे.**

उपरोक्त **परीशिष्ट अ** मधील रेट कॉन्ट्रक्ट दराप्रमाणे रु. ४,४१,०३४/-(अक्षरी रु.चार लाख एक्केचाळीस हजार चौतीस मात्र) तसेच **परीशिष्ट ब** मधील ई-निविदेतील न्युनतम दराप्रमाणे साहीत्य खरेदी केलेस रु. ४,०९,१८०/- (अक्षरी रु.चार लाख नऊ हजार एकशे अंशी मात्र) असा खर्च येत आहे. याकामी दि.२४.०६.२०१५ रोजीचे उपसमितीचे सभेत निर्णय क्रमांक १६२ नुसार **परिशिष्ट अ व ब** मधील साहीत्य खरेदी कामी रु.७,००,०००/- (अक्षरी रु. सात लाख मात्र) खर्चास मान्यता मिळालेली आहे. परंतू **अ व ब** परिशिष्ट मधील साहीत्य खरेदी करणेस प्रत्यक्ष

रु.८,५०,२१४/- (अक्षरी रु.आठ लाख पन्नास हजार दोनशे चौदा मात्र) इतका खर्च येत आहे. मंजूर रकमेपेक्षा रु.१,५०,२१४/- (अक्षरी रु. एक लाख पन्नास हजार दोनशे चौदा मात्र) वाढीव खर्च येत आहे.

तरी उपरोक्त अ मधील साहीत्य रेट कॉन्ट्रक्ट प्रमाणे कार्यादेश देणेत आलेला आहे व ब मधील ई-निविदेतील न्युनतम दराप्रमाणे ठेकेदारास कार्यादेश देणेस व त्याकामी येणा-या सर्वसमावेशक खर्चास तसेच वाढीव रक्कम रु.१,५०,२१४/- खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, फायर अॅण्ड सेफ्टी विभागाकडील अग्नीशमन वाहनाकरीता साहित्य खरेदीकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीस व याकामी आलेल्या वाढीव खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- फायर अॅण्ड सेफ्टी विभागप्रमुख)

---

**विषय नं.०३** **सिंहस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये सुरक्षा व वाहतुक नियमनाकरीता बंदोबस्तासाठी येणारे पोलिस अधिकारी/ कर्मचारी यांची अल्पोपहार व प्रसाद भोजन व्यवस्थेबाबत.**

**प्रस्ताव-** नाशिक सिंहस्थ कुंभमेळा-2015 चे कालावधी शिर्डी मध्ये साईबाबाच्या समाधीच्या दर्शनासाठी होणाऱ्या गर्दीच्या अनुषंगाने गर्दीच्या नियोजनासाठी कर्तव्यावर असलेले पोलिस कर्मचारी, स्वयंसेवक, तसेच इतर शासकीय व निमशासकीय विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचे करीता फुड पॅकेटचे विनामुल्य सोय करणे व फुड पॅकेट पेहोचविणेसाठी प्रसादालय विभागामार्फत स्वतंत्र यंत्रणा उभारणे बाबत. संदर्भिय नुसार पत्र प्राप्त झालेले आहे.

**मागणी:-** सिंहस्थ कुंभमेळा- 2015 मध्ये पोलिस कर्मचारी, स्वयंसेवी, शासकीय अधिकारी यांचे करीता फुड पॉकेट विनामुल्य पुरविणे व पोहोचविणे करीता स्वतंत्र यंत्रणा उभारणेस खालीलप्रमाणे निर्णय होणेस विनंती.

1) सिंहस्थ कुंभमेळा- 2015 मध्ये पोलिस कर्मचारी, स्वयंसेवी, शासकीय अधिकारी यांचे करीता फुड पॉकेट सशुल्क अथवा निशुल्क दयावे तसेच यापुर्वि कधीही विनामुल्य फुड पॅकेट बाहेर दिलेले नसल्यामुळे त्यांना फुड पॅकेट विनामुल्य दयावे किंवा कसे या बाबत निर्णय होणे आवश्यक आहे.

2) कुंभमेळानिमित्त बंदोबस्तासाठी येणारे पोलिस कर्मचारी स्वयंसेवी, शासकीय अधिकारी यांची संख्या संदर्भिय पत्रामध्ये नमुद केलेले नसल्यामुळे त्यांचे करीता किती फुड पॅकेट तयार ठेवावे यांबाबत संभ्रम निर्माण होत आहे.

3) कुंभमेळानिमित्त येणारे पोलिस कर्मचारी स्वयंसेवी, शासकीय अधिकारी यांचे मागणी प्रमाणे फुड पॅकेट विनामुल्य अथवा सशुल्क देणेबाबत निर्णय झालेस सकाळी 7.00ते 9.00 या वेळेत प्रसादालयात उपलब्ध करुन त्यांचे प्रतिनिधी मार्फत त्यांचे वाहनामध्ये घेऊन जाणेस त्यांना कळविता येईल

4) यापुर्वी कधीही बाहेर फुड पॅकेट पोहोच केलेले नसल्यामुळे त्यांना फुड पॅकेट पोहोच करणे शक्य नाही असे नम्र मत आहे.

5) आवश्यक असणारे फुड पॅकेटची संख्या त्यांनी एक दिवस अगोदर कळविणेस त्यांचे मागणीप्रमाणे फुड पॅकेटचा त्यांना वेळेत पुरवठा करता येईल.

उपरोक्तप्रमाणे विचार करीता सिंहस्थकुंभ मेळा -2015 या कालावधीममध्ये पोलिस कर्मचारी, स्वयंसेवी, शासकीय अधिकारी यांचे करीता फुड पॉकेट सशुल्क अथवा निशुल्क याबाबत निर्णय झालेनंतर प्रसादालयात त्यांचे प्रतिनिधीमार्फत व त्यांचे वहानामध्ये सकाळी 7.00 ते 9.00 या वेळेत देता येईल असे नम्र मत आहे.

**विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:-** नाशिक सिंहस्थ कुंभमेळा-2015 या कालावधीमध्ये पोलिस कर्मचारी, स्वयंसेवी, शासकीय अधिकारी यांचे करीता फुड पॉकेट प्रसादालयातुन सशुल्क अथवा निशुल्क देणेबाबतचा आदेश होणेस विनंती व झालेला निर्णय कुंभमेळा कक्षामार्फत कळविणेस मान्यता असावी हि विनंती.

**निर्णय क्र.२५३** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईप्रसादालयामार्फत साईभक्त व इतर सर्वांसाठी नाममात्र शुल्कामध्ये प्रसादभोजन, नाष्टा, चहा वगैरे पुरविण्यात येते व सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ मध्ये बंदोबस्तासाठी येणारे पोलिस अधिकारी/ कर्मचारी तसेच शासकीय अधिकारी यांना शासनाकडून त्यासाठीचा भत्ता मिळत असतो. तसेच श्री साईप्रसादालयामध्ये साईभक्तांनी दिलेल्या देणगीमधून बरेचसे दिवस मोफत प्रसादभोजन चालू असते. सबब कुंभमेळा कालावधीमध्ये बंदोबस्तासाठी येणारे पोलिस अधिकारी/ कर्मचारी अथवा इतर शासकीय अधिकारी यांची अल्पोपहार व प्रसादभोजन याची प्रचलित पध्दतीने, प्रचलित दराने सशुल्क व्यवस्था करणेत यावी.**

**तसेच कुंभमेळयाच्या कालावधीमध्ये विनामोबदला सेवा करणेसाठी स्वयंसेवकांची नेमणूक करावयाची असल्याने या स्वयंसेवकांची अल्पोपहार, प्रसादभोजनाची व्यवस्था विनामुल्य करणेत यावी.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय/ कॅन्टीन विभाग/ संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.०४** **सिंहस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये साईभक्तांचे सुलभ दर्शन व्हावे याकरीता डीजीटल एलईडी स्क्रीन बसविणेबाबत.**

**प्रस्ताव-** नाशिक सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ दि.०१/०८/२०१५ ते दि.३०/०९/२०१५ या कालावधीत श्रींचे मंदिरात दर्शनासाठी लाखांचे संख्येने भावीक दर्शनासाठी येतील असा अंदाज आहे. त्यासअनुसरुन मंदिर व परिसरातील येणा-या सर्व साईभक्तांचे गर्दीच्या काळात श्रींचे दर्शन सुलभ होणेसाठी मंदिर व परिसरात १३ ठिकाणी भाडेतत्वावर डीजीटल एलईडी स्क्रीन बसविणे प्रस्तावीत आहे. यासाठी मा.उच्च न्यायालयाने सिव्हील अप्लीकेशन नं.३५००/२०१५ अन्वये डीजीटल एलईडी स्क्रिन बसविणेकामी रक्कम रुपये- २४,००,०००/- लाख मात्र या रक्कमेस मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.११/०७/२०१५ ते दि.२१/०७/२०१५ अखेर या कालावधीत शासनाच्या www.mahatenders.

gov.in या संकेत स्थळावर ऑनलाईन टेंडर प्रसिध्द करण्यात आलेले आहे. यानुसार सदर टेंडरकरीता ऑनलाईन टेंडरमध्ये एक टेंडरधारकाने टेंडर भरले आहे. सदरकामी एकच टेंडर असल्यामुळे,सदर टेंडर री-टेंडर करावे लागणार आहे.

या संदर्भात दि.०१/०४/२०१५ मे गोल्ड एलईडी,मुंबई यांचेकडून स्क्रीन बसविणेकामी प्रस्ताव ई-मेलव्दारे करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावामध्ये एलईडी स्क्रीनवर प्रक्षेपनाचे दर.१ तासाला काही मिनीटांच्या जाहीराती प्रक्षेपित.करणारअसल्याचे नमुद केलेले आहे. त्यासाठी ते मासिक रुपये- १,००,०००/- (अक्षरी- रुपये एक लाख मात्र ) भाडे संस्थानला देणार आहेत. व उर्वरीत वेळ हा श्रींचे लाईव्ह प्रक्षेपितकरणार आहे. परंतु मे.गोल्ड एलईडी, मुंबई यांचे स्क्रीन नाशिक कुंभमेळयाकरीता लावलेले असल्यामुळे, त्यांनी एलईडी स्क्रीन लावणेकामी दुस-या कंपनीचे पुरवठाधारक यांना सदरचे काम करुन घेणेकामी इकडील कार्यालयास पाठविलेले आहे. त्यानुसार दि.१२/०८/२०१५ रोजीचे ई-मेलव्दारे मे.आर.डब्ल्यु. प्रमोशन्स् प्रा.लि.मुंबई यांचेकडून प्रस्ताव प्राप्त झाला असून,सदर प्रस्तावामध्ये सदर कंपनी एलईडी स्क्रीनवर प्रक्षेपनाचे दर १ तासाला १० मिनिटांच्या जाहीराती प्रक्षेपित करणार असल्याचे नमुद केले आहे. सदर एलईडी प्रक्षेपणासाठी त्यांना संस्थानमार्फत विद्युत पुरवठा, साऊंड सिस्टीम द्यावी लागेल तसेच सदर स्क्रीन बसविणेकामी जागानिश्चित करुन द्याव्या लागतील. व जाहीराती प्रक्षेपन करतांना कोणतेही प्रकारे तक्रार येणार नाही याचे त्यांनी आश्वासन दिलेले आहे. त्यासाठी ते प्रतिमाह प्रति स्क्रीनसाठी रुपये- ५०,०००/- (अक्षरी- पन्नास हजार रुपये मात्र) भाडे संस्थानला देणार आहेत व उर्वरीत वेळ हा श्रींचे लाईव्ह दर्शन प्रक्षेपित करणार आहेत. असे एकूण-०७ एलईडी स्क्रीन कार्यान्वीत करणार आहेत.

तरी सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ करीता साईभक्तांचे सुलभ दर्शन व्यवस्थेसाठी एलईडी स्क्रीन बसविणे व प्रक्षेपित करणेकामी मे.आर.डब्ल्यु.प्रमोशन्स् प्रा.लि.मुंबई यांचेकडून प्रतिस्क्रीन प्रतिमाह रुपये- ५०,०००/- (अक्षरी- पन्नास हजार रुपये मात्र) घेणेस व सदर कंपनीस एईडी स्क्रीनए बसविणेकामी कार्यादेश देणेस मान्यता मिळणेच्या आदेशास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.२५४** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये साईभक्तांचे सुलभ दर्शन व्हावे याकरीता भाडेतत्वावरील डीजीटल एलईडी स्क्रीन बसविणेकामी अल्प मुदतीच्या फेरनिविदांची मागणी करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सी.सी.टी.व्ही. कंट्रोल सेलप्रमुख)

---

**विषय नं.०५** **सिंहस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये पोलिस यंत्रणेसाठी शिर्डी शहरामध्ये मध्यवर्ती ध्वनिक्षेपण यंत्रणा भाडेतत्वावर उभारणेकामी तुलनात्मक तक्त्यानुसार कमर्शियल ई-निविदांच्या निर्णयाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.उपविभागीय पोलिस अधिकारी, शिर्डी यांनी भक्तांसाठी वाढीव दर्शनरांगेसाठी तथा नगर मनमाड रोडवरील साईआश्रम-०१ ते प्रसादालय कॉर्नरपर्यंत विविध सेक्टरमध्ये Zone Plan तयार केला असून भाडेतत्वावर मध्यवर्ती ध्वनिक्षेपण यंत्रणा तात्पुरते स्वरूपात उभारणेबाबत दि.३०.०७.२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविलेले आहे. त्यानुसार दि.०२.०८.२०१५ रोजीचे सभेतील मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील निर्देशानुसार अंदाजे रक्कम रू. २६,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे "मध्यवर्ती ध्वनिक्षेपण यंत्रणा" भाडेतत्वावर उभारणेकामी दि.०५.०८.२०१५ रोजी संस्थानचे संकेतस्थळावर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली. त्यास ०६ निविदाधारकांच्या ई-निविदा संस्थानला प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी निविदेतील अटी व शर्तीनुसार, शांती ऑडीओ लाईट, अ.नगर या निविदाधारकाचा वार्षिक उलाढाल (Turnover) २५ लाखापेक्षा कमी असल्याने लेखाशाखेच्या तपासणीनुसार त्यांना अपात्र ठरविले आहे. दि.१७.०८.२०१५ रोजी उर्वरीत ०५ निविदाधारकांचे कमर्शियल ई-निविदा प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आले आहे त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| **अ. नं.** | **कामाचा तपशिल** | **विजय मंडप साऊंड, औरंगाबाद** | **लोखंडे इलेक्ट्रीकल, नाशिक** | **भाग्यदिप इंडस्ट्रीयल, औरंगाबाद** | **काळे ॲण्ड सन्स, पुणे** | **रुतुजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद** | **निम्नतम दर** |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | शिर्डी येथे सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ निमीत्ताने पोलिस यंत्रणेसाठी भाडेतत्वावर "मध्यवर्ती ध्वनिक्षेपण यंत्रणा" उभारणे. | १८,१८,९१२/- | ३२,२२,८११/- | **१६,८७,२००/-** | १७,४९,९९८/- | १,८५,७००/- (चुकीचे दरपत्रक भरलेबाबत पत्र दिले) | **१६,८७,२००/-** |

उपरोक्तप्रमाणे ०५ निविदाधारकांपैकी रुतुजा मंडप डेकोरेटर्स, औरंगाबाद यांचे सामान्य प्रशासन विभाग आवक नंबर ९६४४ ने दि.१७.०८.२०१५ रोजीचे पत्रान्वये ई-निविदेमध्ये दरपत्रक भरतांना चुकले असल्याचे कळविले आहे. त्यानुसार उर्वरीत तक्त्याचे अवलोकन केले असता, भाग्यदिप इंडस्ट्रीयल, औरंगाबाद यांचे दर रक्कम रूपये १६,८७,२००/- (अक्षरी रूपये सोळा लाख सत्याऐंशी हजार दोनशे मात्र) हे सर्वात कमी आहे,

उपरोक्तप्रमाणे सिंहस्थ कुंभमेळयाकरीता पोलिस यंत्रणेसाठी शिर्डी शहरामध्ये "मध्यवर्ती ध्वनिक्षेपण यंत्रणा" भाडेतत्वावर घेणेकामी मा.त्रिसदस्य समितीचे सभेसमोर अंतिम निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.२५५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये पोलिस यंत्रणेसाठी शिर्डी शहरामध्ये मध्यवर्ती ध्वनिक्षेपण यंत्रणेची भाडेतत्वावर उभारणी करणेकामी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचे अवलोकन करणेत आले व याकामी तुलनात्मक तक्त्यामधील भाग्यदिप इंडस्ट्रीयल, औरंगाबाद यांचे रु.१६,८७,२००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- ध्वनिक्षेपण विभागप्रमुख)

---

**विषय नं.०६** **गुरुस्थान गेट येथे लोखंडी रॅम्प तयार करणेकामी प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** दिनांक ०२/०८/२०१५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे संस्थान व्यवस्थापन समिती तसेच जिल्हा पोलीस अधिक्षक, उप-विभागीय अधिकारी,शिर्डी यांचे समवेत सिंहस्थ कुंभमेळयानिमित्त शिर्डी शहरामध्ये निर्माण करावयाच्या विविध सुविधांच्या आढाव्याबाबत झालेल्या बैठकीत सिंहस्थ कुंभमेळातील पर्वणीच्या काळात भाविकांना दर्शनानंतर गुरुस्थान गेटमधुन मंदिर परिसरात प्रवेश देण्यासाठी असलेल्या पाय-यांच्या ठिकाणी लोखंडी रॅम्प, रेलींगची व्यवस्था करणे तसेच तयार करण्यात आलेले रॅम्प स्ट्रक्चर ड्रॉईंग बरोबर असलेबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या यंत्रणेकडून प्रमाणित करुन घेणेबाबत सूचना करण्यात आलेली आहे.

उपरोक्त सुचनेनुसार गुरुस्थान गेट पाय-यावर रॅम्प तयार करणेकामी ड्रॉईंग तयार करण्यात आलेले असून सदरचे ड्रॉईंग सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेकडून प्रमाणित करुन घेण्यात येत आहे. सदरचा रॅम्प प्रमाणित करुन घेणेकामी खालील प्रमाणे मटेरिअल / खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | मटेरिअलचा तपशील | नग | युनिट | दर | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| 1. | M.S.Angle – 50mm x 50mm x 6 mm | 400 | Kg. | 52/- | 20,800/- |
| 2. | M.S.Round Pipe – 40 Dia x 3 mm | 30 | Kg. | 52/- | 1,560/- |
| 3. | M.S.Round Pipe – 25 Dia x 2 mm | 70 | Kg. | 52/- | 3,640/- |
| 4. | M.S.Checker Plate – 4 mm Thick | 220 | Sq.Ft. | 101/- | 22,220/- |
| 5. | Colour – Asian Make Black | 4 | Ltrs. | 300/- | 1,200/- |
| | | | | **एकूण रुपये** | **49,420/-** |

उपरोक्त प्रमाणे रॅम्प तयार करणेसाठी रुपये 49,420/- खर्च अपेक्षित आहे. रॅम्पकरीता आवश्यक मटेरिअल इकडील विभागाकडे शिल्लक नसलेने, तसेच सिंहस्थ कुंभमेळातील पर्वणीचा काळ जवळ आल्याने रॅम्प बाहेरील वर्कशॉपधारक/फॅब्रिकेटर्स यांचेकडून विहीत पध्दतीने कोटेशन मागवून तातडीने तयार करुन घ्यावा लागणार आहे. याकामी येणा-या रक्कम रुपये ४९,४२०/- मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी सिहंस्थ कुंभमेळातील पर्वणीच्या काळात भाविकांना दर्शनानंतर गुरुस्थान गेटमधून मंदिर परिसरात प्रवेश देण्यासाठी असलेल्या पाय-यांच्या ठिकाणी विहीत पध्दतीने लोखंडी रॅम्प, रेलींग तयार करणेस व त्याकामी येणा-या रक्कम रु. 49420//- मात्रचे खर्चास प्रशासकीय मान्यतेकरीता प्रस्ताव मा.त्रिसदस्यीय समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.२५६** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सिहंस्थ कुंभमेळातील पर्वणीच्या कालावधीमध्ये श्रींच्या दर्शनानंतर भाविकांना गुरुस्थान गेटमधून मंदिर परिसरात प्रवेश करणेसाठी असलेल्या पाय-यांच्या ठिकाणी लोखंडी रॅम्प, रेलींग तयार करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.४९,४२०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

---

**विषय नं.०७** **सिहंस्थ कुंभमेळा कालावधीत होणा-या गर्दीचे नियोजनकामी स्वयंसेवक उपलब्ध करुन देणेबाबत.**

**प्रस्ताव-** नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ चे कालावधीत शिर्डी मध्ये श्री साईबाबा समाधीच्या दर्शनासाठी होणा-या गर्दीच्या अनुषंगाने साईभक्तांसाठी उपलब्ध करावयाच्या सोयी सुविधांबाबत केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेसाठी श्री.कुंदन सोनवणे, उपविभागीय अधिकारी,शिर्डी भाग,शिर्डी यांचे अध्यक्षतेखाली दि.२३.०६.२०१५ रोजी साईनिवास सभागृहात मिटींग आयोजित करणेत आलेली होती.

सदर मिटींग मध्ये ठरले प्रमाणे कुंभमेळा कालावधीत होणा-या गर्दीच्या अनुषंगाने करावयाचे नियोजन व उपलब्ध करावयाच्या सोयी सुविधांचे उत्कृष्ट नियोजनासाठी जास्तीत जास्त मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून स्वयंसेवक घेणेसाठी शिर्डी परिसरातील शाळा कॉलेजस यांना आवाहन करणे बाबतची कार्यवाही संरक्षण विभागाने सुरु केली आहे.

तथापी कुंभमेळाकरीता दर्शनरांगेचे नियोजन, बंदोबस्त व प्रसादभोजन वाढण्यासाठी स्वयंसेवकांना वर्तमानपत्रातून जाहीर आवाहन करणेबाबत जाहिरात देणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने जा.नं.एसएसएस/वशी-पीआरओ/४७/२०१५ दि.१४.०७.२०१५ रोजीचे पत्रामध्ये पालखीने येणा-या पदयात्रींची माहिती आपले विभागाकडे असते तसेच गर्दीच्या कालावधीत संस्थानच्या शैक्षणिक संकुलाकडून स्वयंसेवक घेणेकामीची कार्यवाही आपलेच विभागामार्फत करण्यात यावे तरी याबाबत जनसंपर्क विभागाचा कोणताही संबध येत नसल्याने उपरोक्त कार्यवाही आपले विभागाकडून करण्यात यावी असे नमुद केले आहे.

त्या अनुषंगाने संरक्षण जा.नं.४११/२०१५ दि.१५/०७/२०१५ चे टिपणीनुसार जनसंपर्क विभागामार्फत जाहिरातीचा मसुदा तयार करुन जाहिरात प्रसिध्द करणेस प्रशासकिय मान्यता मिळालेली आहे. परंतू यापुर्वी जा.नं. एसएसएस/ पीआरओ/७०६/२०१५ चे पत्रान्वये प्रसिध्द करावयाच्या जाहिरातीचा मसुदा तयार करुन जनसंपर्क विभागाकडे पाठविणेबाबत आदेश झालेला असल्याने जाहिरातीचा मसुदा तयार करुन टिपणीसोबत सादर केलेला

असून सोबतच्या मसुद्याप्रमाणे जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत नगर, नाशिक,औरंगाबाद,पुणे,मुंबई या ठिकाणी प्रसिध्द होणा-या दैनिकात शासकीय दराने प्रसिध्द करणेस तसेच माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत संस्थानचे वेबसाईटवर प्रसिध्द करणेस व त्याकामी येणारा अंदाजे खर्च रक्कम रुपये १,५०,०००/- मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२५७ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, कुंभमेळयाच्या कालावधीमध्ये होणा-या गर्दीचे नियोजन करणेकामी स्वयंसेवक म्हणून काम करणेसाठी संस्थान शैक्षणिक संकुलामधील विद्यार्थी व शिर्डी परिसरातील महाविद्यालयांमधील विद्यार्थी मिळणार असून नियमीतपणे पालखीमध्ये येणा-या पदयांत्रींनीही यासाठी नावनोंदणी केलेली आहे. याकरिता स्वयंसेवक उपलब्ध करणेसाठी जाहिरात प्रसिध्द करणेची आवश्यकता नाही.**

(कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

विषय नं.०८ **सिहंस्थ कुंभमेळा कालावधीत गर्दीचे नियोजनाकरीता वाढीव मंडपाकरीता सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणेबाबत.**

प्रस्ताव- नाशिक येथे २०१५ मध्ये होणा-या कुंभमेळा कालावधीत शिर्डीमध्ये श्रींच्या दर्शनासाठी होणा-या संभाव्य गर्दीचे व्यवस्थापन व त्याबाबत संस्थानने उपलब्ध करुन द्यावयाच्या सोयी-सुविधांबाबत संबंधीत विभागांनी करावयाचे कार्यवाहीबाबत दि. ०७/०१/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे कक्षात बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये संरक्षण विभागास नियोजित वाहन तळ, साईबाबा भक्तनिवासस्थान ते शासकीय विश्रामगृह व गेट नं. १ ते हॉटेल एमटीडीसी, गेट नं. २ पर्यंतचे वाढीव दर्शनरांग आदि. ठिकाणी सुरक्षा नियोजनाकरीता लागणारे सुरक्षा रक्षकांबाबत चर्चा करण्यात आली. सदर मिटींगमध्ये ठरलेप्रमाणे संरक्षण विभाग जा.नं.१०६७ दि.१७/०१/२०१५ नुसार दि.०१/०८/२०१५ ते ३०/०९/२०१५ या कालावधीमध्ये ६१ दिवसाकरीता दररोज ४७७ जादा सुरक्षा कर्मचारी मिळणेबाबत व अंदाजे रु.८७,१९,१००/- चे खर्चास मान्यता मिळणेबाबत टिपणी प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आली होती. सदरचे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी श्री गमे (आस्था) कृ.आढावा घेऊन सादर करावे असा शेरा मारल्याने पुन्हा फेरआढावा घेवून दि.०१/०८/२०१५ ते ३०/०९/२०१५ अखेर दररोज ३९७ सुरक्षा कर्मचारी मिळणेबाबत व अंदाजे रु.७२,६५,१००/- चे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. जा.नं.एसएसएस/वशी-०५/४९२८/२०१५ दि. २६/०१/२०१५ नुसार कुंभमेळा कालावधीत वाढीव मनुष्यबळाची निश्चित माहिती वशी-५ कडे देणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार दि.०१/०८/२०१५ ते ३०/०९/२०१५ अखेर दररोज ३९७ सुरक्षा कर्मचारी मिळणेबाबत दि.०७/०२/२०१५ रोजी वशी-०५ कडे प्रस्ताव देण्यात आलेला आहे.

तसेच कुंभमेळा नियोजनाबाबत दि. ०६/०२/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत ठरलेप्रमाणे ( जा.नं.एसएसएसटी/कुंभमेळा-शताब्दी/जा.नं./५२२७/२०१५ दि. १७/०२/२०१५ नुसार सदर बैठकीचे इतिवृत्त) खर्चाबाबतची माहिती दि. ०७/०२/२०१५ रोजी कुंभमेळा कक्षाकडे देण्यात आलेली आहे. सदर माहितीमध्ये वाढीव दर्शन रांग व नियोजित वाहनतळ तसेच वाढीव वाहनतळ निर्माण केल्यास त्यासाठी असे एकूण ४७३ कर्मचा-यांची मागणी केलेली आहे.

बांधकाम विभाग (कुंभमेळा कक्ष) यांचेमार्फत कुंभमेळा कालावधीत साईभक्तांना पुरविण्यात येणा-या सेवा–सुविधाबाबतचे खर्चाचा एकत्रित रु. ५७,५४,८०,०००/- मात्रचा प्रस्तावास मान्यता मिळणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेकामी मा. हायकोर्टातील संस्थानचे वकील ॲड. संजय चौकीदार यांनी ॲप्लीकेशनचा मसुदा दि. ०४/०३/२०१५ रोजी संस्थानकडे पाठविला असून सदर मसुदा कुंभमेळा कक्षामार्फत दि. ०५/०३/२०१५ रोजी तपासून दि. ०७/०३/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीसह नोटरी नोंदवून विधी विभागामार्फत ॲड.चौकीदार यांचेकडे पाठविण्यात आलेला असून दि. ०९/०३/२०१५ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करण्यात आला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. ३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ०६ नुसार दि. २७/०८/२०१५ ते द. २६/०९/२०१५ या कालावधीमध्ये सिंहस्थ कुंभमेळा निमित्त येणा-या साईभक्तांना संस्थानचे संबंधीत विभागांमार्फत पुरवावयाच्या सेवा–सुविधाबाबतचा एकत्रित रु. ५७,५४,८०,०००/- मात्रचा अंदाजपत्रकिय खर्चाबाबतचा प्रस्ताव बांधकाम (कुंभमेळा) विभागामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन नं. १८/२०११ मध्ये सिव्हील अर्ज नं. ३५००/२०१५ अन्वये दाखल करण्यात आला होता. त्यावर मा. उच्च न्यायालय यांनी दि. ०६/०५/२०१५ रोजीच्या आदेशान्वये सदर खर्चास मान्यता दिलेली आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये प्रासंगिक मनुष्यबळ खर्चाकरीता एकूण रु. ८१,१६,४६७/- मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु यामध्ये संरक्षण विभागाडील सुरक्षा कर्मचा-यांचा समावेश करण्यात आलेला नसल्याने मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे अध्यक्षतेखाली दि. १३/०५/२०१५ रोजी झालेल्या बैठकीत ठरलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेकामी दि. २०/०५/२०१५ रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे कक्षात बैठक घेण्यात आली. कुंभमेळा कालावधीत संरक्षण विभागाचे मागणीनुसार वाढीव सुरक्षा रक्षक पुरविणेस मा. मुंबई उच्च न्यायालयाची मान्यता नसल्याने इतर विभागांस देण्यात आलेल्या मंजूरीचा फेर आढावा घेण्यात येऊन संबंधीत विभागांकडील अनावश्यक मंजूरी कमी करुन संरक्षण विभागास सुरक्षा रक्षक पुरविणेबाबत सदर बैठकीत प्र. कामगार अधिकारी यांचेसमवेत चर्चा झालेली असून सुरक्षा रक्षकांबाबत फेर नियोजन करुन त्याप्रमाणे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले होते. त्यानुसार कामगार विभागामार्फत जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१६७३/२०१५ दि.०४/०८/२०१५ चे आदेशान्वये मे.जयभवानी एंटरप्राईजेस इंडिया प्रा.लि. कॅम्प, शिर्डी व जा.नं.एसएसएस/वशी/७ए/१६७४/२०१५ दि.०४/०८/२०१५ चे आदेशान्वये मे.मॉडर्ण व्ही.आर.

सिक्युरिटी फोर्स इं.प्रा.लि. कॅम्प, शिर्डी यांना खालील तारखांना संरक्षण विभागाकरीता जादा ३०० सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत आदेश झालेला आहे.

**(अ) कुंभमेळा कालावधीत संरक्षण विभागाकरीता सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत झालेला आदेश.**

| अ.नं. | कंत्राटी कर्मचारी पुरविणेचा कालावधी | मे.जयभवानी एंटरप्राईजेस इंडिया प्रा.लि. कॅम्प, शिर्डी | मे.मॉडर्ण व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स इं.प्रा.लि. कॅम्प, शिर्डी |
|---|---|---|---|
| ०१. | दि.२७/०८/२०१५ ते ३१/०८/२०१५ अखेर ०५ दिवस<br>दि.११/०९/२०१५ ते १५/०९/२०१५ अखेर ०५ दिवस<br>दि.१६/०९/२०१५ ते २०/०९/२०१५ अखेर ०५ दिवस<br>दि.२३/०९/२०१५ ते २७/०९/२०१५ अखेर ०५ दिवस | दररोज १५० सुरक्षा कर्मचारी | दररोज १५० सुरक्षा कर्मचारी |

आता कुंभमेळयाचे गर्दीचे नियोजनाकरीता साईनगर मैदान, साईबाबा भक्तनिवासचे पार्कींग ग्राऊंड, साईआश्रम नं.०१ येथील मंडप व साईआश्रम नं.०२ येथील वाढीव मंडपामध्ये सुविधा पुरविणेकामी विद्युत विभागामार्फत लाईटची व्यवस्था करणेकामी केबल टाकणे, मोठे लाईट लावणे, पाणी पुरवठा विभागामार्फत पाण्याच्या टाक्या ठेवणेचे काम तसेच ध्वनीक्षेपण विभागामार्फत ध्वनीक्षेपणाची व्यवस्था करण्याचे काम चालू झालेले असून सदरचे संस्थान मालमत्तेचे रक्षण होणेसाठी सुरक्षा कर्मचारी नेमणूक करणेबाबत मागणी होत आहे. त्यामुळे सदरचे ठिकाणी संस्थान मालमत्तेचे रक्षण करणेसाठी सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत मंजूरी मिळालेली नसलेने सध्याचे दैनंदिन मंजूर मनुष्यबळामधून सध्या दि.०५/०८/२०१५ पासुन सध्याचे उपलब्ध मनुष्यबळामधून सुरक्षा रक्षक पुरविणेत येत आहेत. त्यामुळे सध्याचे पॉईंटवरील कर्मचारी काढून पार्कींगचे ठिकाणी पाठविले जात असल्याने सुरक्षा यंत्रणेवर कामाचा ताण पडत आहे. परिणामी साईभक्तांना सेवा देण्यास अडचण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी संरक्षण विभागाकरीता कुंभमेळयाचे गर्दीचे नियोजनकामी संस्थानमार्फत पुरविल्या जाण्या-या वाढीव सुविधांचे ठिकाणी संस्थान मालमत्तेचे रक्षण करणेसाठी दि.१५/०८/२०१५ पासुन कुंभमेळा कालावधी पुर्ण होईपर्यंत दि.३०/०९/२०१५ अखेर खालील तपशिलप्रमाणे जादा सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत कामगार विभागामार्फत संबंधीत एजन्सीला आदेश होणे आवश्यक आहे.

**(क) वाढीव मंडप व पार्कींगकरीता आवश्यक सुरक्षा कर्मचारी.**

| अ.नं. | मंडपाचे ठिकाण | एका शिफटला कर्मचारी | | | तिन शिफटसाठी दररोज आवश्यक एकूण कर्मचारी |
|---|---|---|---|---|---|
| | | I | II | III | |
| ०१. | साईनगर मैदानावरील वाढीव मंडप | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| ०२. | साईबाबा भक्तनिवास येथील वाढीव मंडप | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| ०३. | साईआश्रम नं.०१ येथील वाढीव मंडप | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| ०४. | साईआश्रम नं.०२ येथील वाढीव मंडप | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| ०५. | रुई हद्दीतील गट नं.३४८ मधील श्री कोते, लोढा व कांकरीया यांचे क्षेत्रातील पार्कींग | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| ०६. | नांदुर्खी बु.येथील गट नं.१७५ मधील श्री शिवाजी चौधरी यांचे क्षेत्रातील पार्कींग | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| ०७. | साईआश्रम नं.2 येथील पार्कींग | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| | **एकूण आवश्यक सुरक्षा गार्ड** | १४ | १४ | २१ | ४९ |

उपरोक्त प्रमाणे वाढीव मंडप व पार्कींग करीता दररोज ४९ सुरक्षा कर्मचारी आवश्यकतेनुसार कामास घेता येतील व काम संपलेनंतर सदरचे कर्मचारी त्वरीत बंद करण्यात येईल. सध्या आपल्याकडील दोन्ही सुरक्षा एजन्सीकडे जादा मनुष्यबळ नसल्यामुळे आहे त्याच सुरक्षा कर्मचा-यास डबल डयुटी करण्यास परवानगी असावी. त्याकामी येणारा खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | दिनांक | एकूण दिवस | दररोज आवश्यक कर्मचारी | अकुशल कर्मचारी दर | येणारा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | वाढीव मंडप Unworking Days | दि.१५/०८/२०१५ ते ३०/०९/२०१५ अखेर ४७ दिवस | ४७ | ४९ | ३४३.५१ | ०७,९१,१०३.५३ |
| | | | **पुर्णांकित रक्कम रुपये-** | | | **०७,९१,१०४.००** |

तरी उपरोक्तप्रमाणे सिहंस्थ कुंभमेळा गर्दीचे नियोजनाकरीता वाढीव मंडप व कार पार्कींगमध्ये संस्थान मालमत्तेचे रक्षण करणेसाठी दि.१५/०८/२०१५ ते ३०/०९/२०१५ अखेर ४७ दिवस दररोज ४९ सुरक्षा कर्मचारी मॉडर्ण व्ही.आर. सिक्युरिटी, कॅम्प शिर्डी (कंत्राटी सुरक्षा एजन्सी) यांचेमार्फत कामावर घेणेस येणा-या रु.०७,९१,१०४/- चे खर्चास मान्यता असावी ही विनंती.

निर्णय क्र.२५८ **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सिहंस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये भक्तांच्या सोयीसाठी उभारणेत आलेले मंडप व कार पार्कींगमधील संस्थान मालमत्तेचे रक्षण करणेसाठी दि.१५/०८/२०१५ ते ३०/०९/२०१५ अखेर ४७ दिवस (तात्पुरत्या कालावधीसाठी) दररोज ४९ सुरक्षा कर्मचारी संस्थानला कंत्राटी पध्दतीने कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मॉडर्ण व्ही.आर. सिक्युरिटी, कॅम्प शिर्डी (कंत्राटी सुरक्षा एजन्सी) यांचेमार्फत कामावर घेणेस व याकामी येणा-या रु.०७,९१,१०४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच दि.३०.०९.२०१५ नंतर तात्पुरत्या कालावधीसाठी कामावर घेण्यात आलेले सदरहू कंत्राटी सुरक्षा कर्मचारी बंद करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.०९ सिहंस्थ कुंभमेळा कालावधीत गर्दीचे नियोजनाकरीता वाढीव कार पार्किंगकरीता सुरक्षा रक्षकांची नेमणूक करणेबाबत.**

**प्रस्ताव-** नाशिक येथे २०१५ मध्ये होणा-या कुंभमेळा कालावधीत शिर्डीमध्ये श्रींच्या दर्शनासाठी होणा-या संभाव्य गर्दीचे व्यवस्थापन व त्याबाबत संस्थानने उपलब्ध करुन द्यावयाच्या सोयी-सुविधांबाबत संबंधीत विभागांनी करावयाचे कार्यवाहीबाबत दि. ०७/०१/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी सो., यांचे कक्षात बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये संरक्षण विभागास नियोजित वाहन तळ, साईबाबा भक्तनिवासस्थान ते शासकीय विश्रामगृह व गेट नं. १ ते हॉटेल एमटीडीसी, गेट नं.२ पर्यंतचे वाढीव दर्शनरांग आदि. ठिकाणी सुरक्षा नियोजनाकरीता लागणारे सुरक्षा रक्षकांबाबत चर्चा करण्यात आली. सदर मिटींगमध्ये ठरलेप्रमाणे संरक्षण विभाग जा.नं.१०६७ दि.१७/०१/२०१५ नुसार दि.०१/०८/२०१५ ते ३०/०९/२०१५ या कालावधीमध्ये ६१ दिवसाकरीता दररोज ४७७ जादा सुरक्षा कर्मचारी मिळणेबाबत व अंदाजे रु.८७,१९,१००/- चे खर्चास मान्यता मिळणेबाबत टिपणी प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात आली होती. सदरचे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी सो. यांनी श्री गमे (आस्था) कृ.आढावा घेऊन सादर करावे असा शेरा मारल्याने पुन्हा फेरआढावा घेवून दि.०१/०८/२०१५ ते ३०/०९/२०१५ अखेर दररोज ३९७ सुरक्षा कर्मचारी मिळणेबाबत व अंदाजे रु.७२,६५,१००/- चे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आला होता. जा.नं.एसएसएस/वशी-०५/४९२८/२०१५ दि. २६/०१/२०१५ नुसार कुंभमेळा कालावधीत वाढीव मनुष्यबळाची निश्चित माहिती वशी-५ कडे देणेबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार दि.०१/०८/२०१५ ते ३०/०९/२०१५ अखेर दररोज ३९७ सुरक्षा कर्मचारी मिळणेबाबत दि.०७/०२/२०१५ रोजी वशी-०५ कडे प्रस्ताव देण्यात आलेला आहे.

तसेच कुंभमेळा नियोजनाबाबत दि. ०६/०२/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत ठरलेप्रमाणे (जा.नं.एसएसएसटी/कुंभमेळा-शताब्दी/जा.नं./५२२७/२०१५ दि. १७/०२/२०१५ नुसार सदर बैठकीचे इतिवृत्त) खर्चाबाबतची माहिती दि. ०७/०२/२०१५ रोजी कुंभमेळा कक्षाकडे देण्यात आलेली आहे. सदर माहितीमध्ये वाढीव दर्शन रांग व नियोजित वाहनतळ तसेच वाढीव वाहनतळ निर्माण केल्यास त्यासाठी असे एकूण ४७३ कर्मचा-यांची मागणी केलेली आहे.

बांधकाम विभाग (कुंभमेळा कक्ष) यांचेमार्फत कुंभमेळा कालावधीत साईभक्तांना पुरविण्यात येणा-या सेवा–सुविधाबाबतचे खर्चाचा एकत्रित रु. ५७,५४,८०,०००/- मात्रचा प्रस्तावास मान्यता मिळणेकामी मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करणेकामी मा. हायकोर्टातील संस्थानचे वकील ॲड. संजय चौकीदार यांनी ॲप्लीकेशनचा मसुदा दि. ०४/०३/२०१५ रोजी संस्थानकडे पाठविला असून सदर मसुदा कुंभमेळा कक्षामार्फत दि. ०५/०३/२०१५ रोजी तपासून दि. ०७/०३/२०१५ रोजी मा. कार्यकारी अधिकारी यांचे स्वाक्षरीसह नोटरी नोंदवून विधी विभागामार्फत ॲड. चौकीदार यांचेकडे पाठविण्यात आलेला असून दि. ०९/०३/२०१५ रोजी मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल करण्यात आला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे दि. ३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ०६ नुसार दि. २७/०८/२०१५ ते द. २६/०९/२०१५ या कालावधीमध्ये सिंहस्थ कुंभमेळा निमित्त येणा-या साईभक्तांना संस्थानचे संबंधीत-विभागांमार्फत पुरवावयाच्या सेवा–सुविधाबाबतचा एकत्रित रु. ५७,५४,८०,०००/- मात्रचा अंदाजपत्रकिय खर्चाबाबतचा प्रस्ताव बांधकाम (कुंभमेळा) विभागामार्फत मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर रिट पिटीशन नं. १८/२०११ मध्ये सिव्हील अर्ज नं. ३५००/२०१५ अन्वये दाखल करण्यात आला होता. त्यावर मा. उच्च न्यायालय यांनी दि. ०६/०५/२०१५ रोजीच्या आदेशान्वये सदर खर्चास मान्यता दिलेली आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये प्रासंगिक मनुष्यबळ खर्चाकरीता एकूण रु. ८१,१६,४६७/- मान्यता देण्यात आलेली आहे. परंतु यामध्ये संरक्षण विभागाडील सुरक्षा कर्मचा-यांचा समावेश करण्यात आलेला नसल्याने मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे अध्यक्षतेखाली दि. १३/०५/२०१५ रोजी झालेल्या बैठकीत ठरलेप्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेकामी दि. २०/०५/२०१५ रोजी मा. प्रशासकीय अधिकारी यांचे कक्षात बैठक घेण्यात आली. कुंभमेळा कालावधीत संरक्षण विभागाचे मागणीनुसार वाढीव सुरक्षा रक्षक पुरविणेस मा. मुंबई उच्च न्यायालयाची मान्यता नसल्याने इतर विभागांस देण्यात आलेल्या मंजूरीचा फेर आढावा घेण्यात येऊन संबंधीत विभागांकडील अनावश्यक मंजूरी कमी करुन संरक्षण विभागास सुरक्षा रक्षक पुरविणेबाबत सदर बैठकीत प्र. कामगार अधिकारी यांचेसमवेत चर्चा झालेली असून सुरक्षा रक्षकांबाबत फेर नियोजन करुन त्याप्रमाणे मान्यतेसाठी प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले होते. त्यानुसार कामगार विभागामार्फत

जा.नं.एसएसएस/वशी-७ए/१६७३/२०१५ दि.०४/०८/२०१५ चे आदेशान्वये मे.जयभवानी एंटरप्राईजेस इंडिया प्रा.लि. कॅम्प, शिर्डी व जा.नं.एसएसएस/वशी/७ए/१६७४/२०१५ दि.०४/०८/२०१५ चे आदेशान्वये मे.मॉडर्ण व्ही.आर. सिक्युरिटी फोर्स इं.प्रा.लि. कॅम्प, शिर्डी यांना खालील तारखांना संरक्षण विभागाकरीता जादा ३०० सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत आदेश झालेला आहे.

**(अ) कुंभमेळा कालावधीत संरक्षण विभागाकरीता सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत झालेला आदेश.**

| अ.नं. | कंत्राटी कर्मचारी पुरविणेचा कालावधी | मे.जयभवानी एंटरप्राईजेस इंडिया प्रा.लि. कॅम्प, शिर्डी | मे.मॉडर्ण व्ही.आर.सिक्युरिटी फोर्स इं.प्रा.लि. कॅम्प, शिर्डी |
|---|---|---|---|
| ०१. | दि.२७/०८/२०१५ ते ३१/०८/२०१५ अखेर ०५ दिवस<br>दि.११/०९/२०१५ ते १५/०९/२०१५ अखेर ०५ दिवस<br>दि.१६/०९/२०१५ ते २०/०९/२०१५ अखेर ०५ दिवस<br>दि.२३/०९/२०१५ ते २७/०९/२०१५ अखेर ०५ दिवस | दररोज १५० सुरक्षा कर्मचारी | दररोज १५० सुरक्षा कर्मचारी |

आता कुंभमेळयाचे गर्दीचे नियोजनाकरीता वाढीव कार पार्कीगवर सुविधा पुरविणेकामी बांधकाम विभागामार्फत मुरुम टाकणे, मंडप टाकणे, विद्युत विभागामार्फत लाईटची व्यवस्था करणेकामी केबल टाकणे, मोठे लाईट लावणे, पाणी पुरवठा विभागामार्फत पाण्याच्या टाक्या ठेवणेचे काम तसेच ध्वनीक्षेपण विभागामार्फत ध्वनीक्षेपणाची व्यवस्था करण्याचे काम चालू झालेले असून सदरचे संस्थान मालमत्तेचे रक्षण होणेसाठी सुरक्षा कर्मचारी नेमणूक करणेबाबत मागणी होत आहे. त्यामुळे सदरचे ठिकाणी संस्थान मालमत्तेचे रक्षण करणेसाठी सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत मंजूरी मिळालेली नसलेने सध्याचे दैनंदिन मंजूर मनुष्यबळामधून सध्या दि.०५/०८/२०१५ पासुन श्री साई प्रसादालयाचे पश्चीम बाजूकडील शेतीमहामंडळाचे क्षेत्रामध्ये, सावळीविहीर येथील सोमैय्या शाळेजवळील वाहनतळ, सावळीविहीर फाटा येथील श्री के.सी.पांडे यांचे क्षेत्रातील वाहनतळ, साकुरी हद्दीतील साई उपासणी फ्रॅब्रीकेशनजवळील वाहनतळ व मार्केट यार्डचे मागील वाहनतळ अशा ०५ ठिकाणचे पार्कीगमध्ये विद्युत विभाग व पाणी पुरवठा विभागाचे काम चालू झालेले असलेने प्रति शिफटला ०२ प्रमाणे तीन शिफटसाठी दररोज ३० सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत कार्यवाही सुरु केलेली आहे. त्यामुळे सध्याचे पॉईटवरील कर्मचारी काढून पार्कीगचे ठिकाणी पाठविले जात असल्याने सुरक्षा यंत्रणेवर कामाचा ताण पडत आहे. परिणामी साईभक्तांना सेवा देण्यास अडचण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

तरी संरक्षण विभागाकरीता कुंभमेळयाचे गर्दीचे नियोजनकामी संस्थानमार्फत पुरविल्या जाण्या-या वाढीव सुविधांचे ठिकाणी संस्थान मालमत्तेचे रक्षण करणेसाठी दि.१५/०८/२०१५ पासुन कुंभमेळा कालावधी पुर्ण होईपर्यंत दि.३०/०९/२०१५ अखेर खालील तपशिलप्रमाणे जादा सुरक्षा कर्मचारी पुरविणेबाबत कामगार विभागामार्फत संबंधीत एजन्सीला आदेश होणे आवश्यक आहे.

**(ब) Unworking Days ला आवश्यक सुरक्षा कर्मचारी कामाचे ठिकाण.**

| अ. नं. | गांव | गट नंबर | वाहन तळाचे ठिकाण | क्षेत्र (हेक्टर-आर) | Unworking Days ला प्रत्येक शिफटला आवश्यक सुरक्षा कर्मचारी | | | प्रति दिनी आवश्यक एकुण सुरक्षा रक्षक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | I | II | III | |
| ०१ | निमगांव को-हाळे | ८५,८६,८७ ८९, ९०/२ | चारी नं.११ लगत दक्षिणेस (सैनिक आरामगृहाजवळील जागा) | ०४-०० | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| ०२ | निमगांव को-हाळे | २३१/०२ | लक्ष्मीवाडी सौमय्या शाळेच्या पाठीमागे | ०३-०० | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| ०३ | सा.विहीर बु. | ५/४/अ | सावळीविहीर फाटा | ०१-०० | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| ०४ | निमगांव को-हाळे | २३/१,२३/२ २२/१,२२/२ | नगर मनमाड रोडचे पूर्व बाजूस | ०१-६५-५० | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| ०५ | साकुरी | २८०/३ | नगर-मनमाड रोड (साई उपासनी फॅब्रीकेशन शेजारी हॉटेल प्रभात समोर, गोदावरी वसाहत) | ०२-२० | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| ०६ | साकुरी | २८१/१/ब/२ | गोदावरी वसाहत (मार्केट यार्ड पाठीमागे) | ०४-०० | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| ०७ | शिर्डी | १५९,१६१ | कनकुरी रोड पाण्याचे टाकीचे जवळ | ००-४० | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| ०८ | शिर्डी | ५९/१ | सुशिलाबसई दिलीप गोंदकर (बिरेगाव रोड, कालिकानगर) | ००-५० | ०२ | ०२ | ०३ | ०७ |
| | | | कार पार्कीगसाठी एकूण आवश्यक सुरक्षा गार्ड | | १६ | १६ | २४ | ५६ |

उपरोक्त प्रमाणे Unworking Days ला वाढीव कार पार्कींग करीता दररोज ५६ सुरक्षा कर्मचारी आवश्यकतेनुसार कामास घेता येतील व काम संपलेनंतर सदरचे कर्मचारी त्वरीत बंद करण्यात येईल. सध्या आपल्याकडील दोन्ही सुरक्षा एजन्सीकडे जादा मनुष्यबळ नसल्यामुळे आहे त्याच सुरक्षा कर्मचा-यास डबल डयुटी करण्यास परवानगी असावी. त्याकामी येणारा खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | तपशिल | दिनांक | एकूण दिवस | दररोज आवश्यक कर्मचारी | अकुशल कर्मचारी दर | येणारा खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ब-वाढीव पार्कींग Unworking Days | दि.१५/०८/२०१५ ते ३०/०९/२०१५ अखेर ४७ दिवस | ४७ | ५६ | ३४३.५१ | ०९,०४,११८.३२ |
| | | | पुर्णांकित रक्कम रुपये- | | | ०९,०४,११८.०० |

तरी उपरोक्त प्रमाणे सिहंस्थ कुंभमेळा गर्दीचे नियोजनाकरीता वाढीव कार पार्कींगमध्ये संस्थान मालमत्तेचे रक्षण करणेसाठी व साईभक्तांचे सुरक्षेसाठी दि.१५/०८/२०१५ ते ३०/०९/२०१५ अखेर ४७ दिवस दररोज ५६ सुरक्षा कर्मचारी मे.जय भवानी एन्टरप्राईजेस कॅम्प, शिर्डी (कंत्राटी सुरक्षा एजन्सी) यांचेमार्फत घेणेकामी येणा-या रु.०९,०४,११८/- चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.२५९** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, सिहंस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये भक्तांच्या सोयीसाठी उभारणेत आलेल्या वाहनतळांवरील संस्थान मालमत्तेचे रक्षण करणेसाठी दि.१५/०८/२०१५ ते ३०/०९/२०१५ अखेर ४७ दिवस (तात्पुरत्या कालावधीसाठी) दररोज ५६ सुरक्षा कर्मचारी संस्थानला कंत्राटी पध्दतीने कर्मचारी पुरविणारे ठेकेदार मे.जय भवानी एन्टरप्राईजेस, कॅम्प शिर्डी (कंत्राटी सुरक्षा एजन्सी) यांचेमार्फत कामावर घेणेस व याकामी येणा-या रु.०९,०४,११८/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच दि.३०.०९.२०१५ नंतर तात्पुरत्या कालावधीसाठी कामावर घेण्यात आलेले सदरहू कंत्राटी सुरक्षा कर्मचारी बंद करणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- संरक्षण विभागप्रमुख)

---

**विषय नं.१०** **सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ कालावधीत अधिग्रहीत करावयाचे खाजगी वाहने/ मिनी बसेस करीता तसेच पाणी पुरवठयासाठीच्या वाहनांचे इंधन खर्चाबाबत.**

**प्रस्ताव-** (०१) सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ नाशिक येथे दि.०१/०७/२०१५ ते दि३०/०९/२०१५ या कालावधीमध्ये नाशिक येथे साजरा केला जाणार आहे. सदर ठिकाणी एक ते दिड कोटी भक्तगण उपस्थित राहणार आहेत. त्यातील साधारण २५ ते ३० लाख भक्तगण शिर्डी येथे भेट देतील असा अंदाज आहे. त्यानुसार गर्दीचे नियोजन करणे कामी संस्थान मार्फत सामुग्री सावळीविहीर येथे वाहनतळे विकसीत करण्यात येत आहे. सदर साकुरी वाहनतळा पासुन ते दर्शनरांग व सावळीविहीर वाहनतळापासुन ते दर्शनरांग असे साईभक्तांना ने-आण करणे कामी मा.विभाग नियंत्रक, म.रा.प.महामंडळ, अहमदनगर यांना सावळीविहीर वाहनतळ ते शिर्डी व साकुरी वाहनतळ ते शिर्डी असे साईभक्तांना ने-आण करणे कामी म.रा.प.महामंडळाचे प्रचलित दरात प्रवास भाडे आकारुन जादा बसेसची व्यवस्था करणे बाबत कळविणेत आले होते.

याबाबत मा. विभाग नियंत्रक, म.रा.प.महामंडळ, अ.नगर यांनी पर्वणी काळामध्ये नाशिक-शिर्डी, व शिर्डी-शिंगणापुर या मार्गावर मोठया प्रमाणावर प्रवासी वाहतुक होणार असल्याने सावळीविहीर ते शिर्डी या अंतर्गत मार्गावर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेस देणे शक्य होणार नाही असे, त्यांनी कळविले आहे. सबब, सदर कालावधीमध्ये श्री साईबाबा संस्थान वाहन विभागाकडे उपलब्ध असलेल्या प्रवासीबस -११ व स्कुलबस-१२ अशा एकुण २३ बसेसचा वापर करता येईल.

सदर काळामध्ये खाजगी बसेस/ वाहने अधिग्रहीत करुन मिळणेबाबत संबंधीत विभागास आदेश होणे बाबत मा.जिल्हाधिकारी सो., अहमदनगर यांना विनंती केली आहे.

मा.जिल्हाधिकारी सो., अहमदनगर यांचे आदेशाप्रमाणे संस्थान खाजगी २५ मिनीबसेस / वाहने अधिग्रहीत केल्यास संबंधीत वाहनांसाठी इंधनाचा संस्थानमार्फत पुरवठा करावा लागेल.

(०२) सिंहस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये पाणी पुरवठा विभागासाठी देणगी स्वरुपात ०३ ट्रक टॅंकर व ०३ ट्रॅक्टर टॅंकर पाणी वाहतुकी साठी मिळणार आहेत. त्यासाठी संस्थानमार्फत इंधन पुरवठा करावा लागेल असे पाणी पुरवठा विभाग यांनी कळविलेले आहे.

(०३) तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, राहाता यांचे मार्फत पुरविण्यात येणा-या रुग्णवाहिका ०७, वैद्यकिय पथक १३ पर्यवेक्षकीय वाहन ०५ तसेच फोगिंगसाठी लागणारे इंधन (पेट्रोल / डिझेल) साठी एकुण ३,९१,६५०/- इतके अनुदान मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

उपरोक्त अ.नं.०१, ०२ व ०३ करीता खालील तपशिलात नमुद केल्याप्रमाणे अंदाजे इंधन खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| ०१ | सदर कामी सिंहस्थ कुंभमेळाचे चार पर्वणीच्या कालावधीमध्ये एकुण दिवसाकरीता २५ मिनीबसेस/ वाहनांसाठी प्रतिदिनी साधारणपणे १३,५०० लिटर इंधन प्रति लिटर दर रु.५१/- प्रमाणे एकुण अंदाजे रु.६,८८,५००/- पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. | ६,८८,५००.०० |

| | | |
|---|---|---|
| ०२ | सिंहस्थ कुंभमेळा कालावधीमध्ये पाणी पुरवठा विभागासाठी देणगी स्वरुपात ०३ ट्रक टँकर व ०३ ट्रॅक्टर टँकर पाणी वाहतुकी साठी मिळणार आहेत. त्यासाठी अंदाजे प्रति दिन ५० लिटर प्रमाणे प्रति लिटर दर रु.५१/- प्रमाणे एकुण अंदाजे रु.५०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. | ५०,०००.०० |
| ०३ | तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, राहाता यांचे मार्फत पुरविण्यात येणा-या रुग्णवाहिका ०७, वैद्यकिय पथक १३ पर्यवेक्षकीय वाहन ०५ तसेच फोगिंगसाठी लागणारे इंधन (पेट्रोल / डिझेल) साठी एकुण ३,९१,६५०/- इतके अनुदान मिळणे बाबत मागणी केलेली आहे. तथापि संबंधीतास रोख रक्कम देणे ऐवजी त्यांचे वाहनांसाठी इंधन पुरवठा संस्थान मार्फत केल्यास अंदाजे रु.२,५०,०००/- पर्यंत खर्च अपेक्षीत आहे. | २,५०,०००.०० |
| | **एकुण** | **९,८८,५००.००** |

उपरोक्त तपशिलात नमुद केलेप्रमाणे सिंहस्थ कुंभमेळावयाचे खाजगी कालावधीत अधिग्रहीत करा २०१५- /वाहनेमिनी बसेस करीता तसेच पाणी पुरवठासाठी वाहने तसेच तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, राहाता यांचे मार्फत पुरविण्यात येणा९.वाहिका व वैद्यकीय पथकाचे इंधन खर्चा करीता अंदाजे रुया रुग्ण-,८८,५००इतका -/ .खर्च अपेक्षीत आहे

सध्या मा. व्यवस्थापन समितीच्या दि.२७/०४/२०१३ रोजीचे सभेतील निर्णयानुसार, संस्थानकडील सर्व वाहनांकरीता तसेच विद्युत विभागाकडील विद्युत जनित्र, भक्तनिवासकडील व श्री साईनाथ रुग्णालयाकडील लॉंड्री मशिनकरीता आवश्यक असणारे इंधन (डिझेल / पेट्रोल) मे. साईसिध्दी पेट्रोलियम, शिर्डी, मा.आमदार श्री राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक्स वाहतुक संस्था लि., प्रवरानगर, ता.राहाता, व श्री साई सर्व्हिस सेंटर, सावळीविहीर यांचेकडून प्रती लिटर ३० पैसे सवलत व एक महिन्याचे क्रेडीट घेवुन इंधन खरेदी करण्यात येत आहे.

त्या प्रमाणेच सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ चे उपरोक्त कालावधी मध्ये आवश्यतेनुसार, वेळोवेळी इंधन खरेदी करुन सदर वाहनांना इंधन पुरवठा करता येईल. तथापि, उपरोक्त खर्चाबाबत तरतुद सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ चे अंदाजपत्रकामध्ये नमुद करण्यात आलेली नाही. त्यामुळे या कामी येणा-या अंदाजे रु.९,८८,५००/- पर्यंतचे खर्चास व प्रचलित पध्दतीने उपरोक्त इंधन पुरवठाधारकांकडून इंधन खरेदी करणेस मान्यता असावी.

निर्णय क्र.२६० **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळयाचे कालावधीत अधिग्रहीत करावयाची खाजगी वाहने/ मिनी बसेस व पाणी पुरवठयाकामीच्या वाहनांना प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे आवश्यकतेनुसार प्रचलीत पध्दतीने इंधन पुरविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.९,८८,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यता आली.**

**तसेच इंधन पुरविण्यात आलेल्या प्रत्येक वाहनांचा कोणी, कोठे, कशासाठी वापर केला व किती इंधन पुरविणेत आले याबाबत सविस्तर माहिती कुंभमेळयाच्या कालावधीनंतर सभेसमोर सादर करणेत यावी.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

विषय नं.११ **सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ कालावधीत आपत्ती व्यवस्थापनासाठी क्रेन, जेसीबी, डंपर इ. वाहने भाडोत्री लावणे व त्याकामी येणा-या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

प्रस्ताव- सिहस्थ कुंभेमळा कालावधीमध्ये संरक्षण विभागाकडील परिपत्रकानुसार व दि.०६/०७/२०१५ रोजीचे मंजर टिपणीनुसार, कुंभमेळा कालावधीत आपत्ती व्यवस्थापनासाठी हाड्रोक्रेन-०१, LMV क्रेन-०१, डंपर-०२, जे.सी.बी.-०३ (एक ऑन कॉल) इ. वाहने भाडोत्री तत्वावर लावणेकामी इकडील जा.नं.एसएसएस/वाहन/१९९८/२०१५ दि.०९/०७/२०१५ रोजीचे पत्राने परिसरातील क्रेनधारकांकडून दरपत्रके मागविण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त झालेली ०६ दरपत्रके मा.कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेनुसार दि.२९/०७/२०१५ रोजी प्रशासकीय अधिकारी यांचे समक्ष उघडणेत आलेली आहेत. सदर दरपत्रकामध्ये देवु केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| अ. नं. | वाहनाचा प्रकार | वेळ | त्रिमुर्ती क्रेन सर्व्हिस, बाभळेश्वर | | गुरुदत्त क्रेन सर्व्हिस, राहुरी | | समृध्दी क्रेन सर्व्हिस, शिर्डी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्टँडींग दर (उभे ठेवणे) | प्रत्यक्ष वापराचे दर | स्टँडींग दर (उभे ठेवणे) | प्रत्यक्ष वापराचे दर | स्टँडींग दर (उभे ठेवणे) | प्रत्यक्ष वापराचे दर |
| | | | प्रति दिन | प्रति तास | प्रति दिन | प्रति तास | प्रति दिन | प्रति तास |
| 01 | जे.सी.बी. | 24 तास | 4399.00 | 699.00 | 5550.00 | 750.00 | --- | --- |
| 02 | हाड्राक्रेन | 24 तास | 4221.00 | 521.00 | 4350.00 | 650.00 | 5500.00 | --- |
| अ.नं. | प्रकार | वेळ | प्रति दिन | प्रति दिन | प्रति दिन | प्रति दिन | प्रति दिन | प्रति दिन |
| 03 | LMVक्रेन | 06 ते 22 | 1211.00 | 4111.00 | 5300.00 | 6600.00 | --- | --- |
| 04 | डंपर | 24 तास | 2950.00 | 19000.00 | 4000.00 | 20000.00 | --- | --- |

| अ. नं. | वाहनाचा प्रकार | वेळ | ओम गुरुदेव क्रेन सर्व्हिस, कोपरगांव | | के.आर. वाबळे, रुई | | संतोष ज्ञानेश्वर उदावंत, शिर्डी-नांदुर्खीरोड | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्टॅडींग दर (उभे ठेवणे) | प्रत्यक्ष वापराचे दर | स्टॅडींग दर (उभे ठेवणे) | प्रत्यक्ष वापराचे दर | स्टॅडींग दर (उभे ठेवणे) | प्रत्यक्ष वापराचे दर |
| | | | प्रति दिन | प्रति तास | प्रति दिन | प्रति तास | प्रति दिन | प्रति तास |
| 01 | जे.सी.बी. | 24 तास | --- | --- | 251.00 | 551.00 | 9600.00 | 650.00 |
| 02 | हाड्राक्रेन | 24 तास | 7000.00 | --- | --- | --- | --- | --- |
| अ.नं. | प्रकार | वेळ | प्रति दिन | प्रति दिन | प्रति दिन | प्रति दिन | प्रति दिन | प्रति दिन |
| 03 | LMVक्रेन | 06 ते 22 | 4500.00 | --- | --- | --- | --- | --- |
| 04 | डंपर | 24 तास | --- | --- | --- | --- | --- | --- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा विचार करता, कुंभमेळा-२०१५ मधील चार पर्वणीचे (अगोदरचे-०२ दिवस मुख्य दिवस-०१ नंतरचे-०२ दिवस एकुण-०५ दिवसाप्रमाणे) एकुण २० दिवस गर्दीच्या कालावधीत आपत्ती व्यवस्थापनासाठी एक जेसीबी मशिनकरीता देवु केलेले न्युनतम दरधारक, के.आर.वाबळे, रा.रुई यांचे स्टॅडींगसाठी (उभे ठेवणे) दर प्रति दिन (२४ तास) रु.२५१/- मात्र व प्रत्यक्ष वापरासाठीचे प्रति तास रु.५५१/- मात्र, एक हाड्राक्रेन, व एक LMV क्रेन करीता देवु केलेले न्युनतम दरधारक, त्रिमुर्ती क्रेन सर्व्हिस, बाभळेश्वर यांचे हाड्राक्रेनकरीता स्टॅडींगसाठी (उभे ठेवणे) दर प्रति दिन (२४ तास) रु.४,२२१/- मात्र व प्रत्यक्ष वापरासाठीचे प्रति तास रु.५२१/- मात्र, LMV क्रेन करीता स्टॅडींगसाठी (उभे ठेवणे) दर प्रति दिन (०६ ते २२ या वेळेत १६ तास) रु.२११/- मात्र व प्रत्यक्ष वापरासाठीचे प्रति दिन (०६ ते २२ या वेळेत १६ तास) रु.४,१११/- मात्र स्विकारणेत येवुन त्यांना कार्यादेश देणे योग्य होईल.

तसेच डंपर करीता दोनच कोटेशनधारकांनी दर देवु केलेले असलेने डंपर करीता पुन्हा दरपत्रके मागविण्यात आलेली व प्राप्त झालेली तिन दरपत्रके मा. कार्यकारी अधिकारी सो. यांचे मान्यतेने मा. प्रशासकीय अधिकारी (वाहन विभाग) यांचे समोर उघडण्यात आलेली आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | वाहनाचा प्रकार | वेळ | त्रिमुर्ती क्रेन सर्व्हिस, बाभळेश्वर | | गुरुदत्त क्रेन सर्व्हिस, राहुरी | | भगवान क्रेन सर्व्हिस, राहुरी | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | स्टॅडींग दर (उभे ठेवणे) | प्रत्यक्ष वापराचे दर | स्टॅडींग दर (उभे ठेवणे) | प्रत्यक्ष वापराचे दर | स्टॅडींग दर (उभे ठेवणे) | प्रत्यक्ष वापराचे दर |
| | | | प्रति दिन | प्रति तास | प्रति दिन | प्रति तास | प्रति दिन | प्रति तास |
| 01 | डंपर | 24 तास | 2950/- | 19000/- | 3500/- | 19500/- | 3600/- | 20000/- |

उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचा विचार करता, कुंभमेळा-२०१५ मधील चार पर्वणीचे (अगोदरचे-०२ दिवस मुख्य दिवस-०१ नंतरचे-०२ दिवस एकुण-०५ दिवसाप्रमाणे) एकुण २० दिवस गर्दीच्या कालावधीत आपत्ती व्यवस्थापनासाठी दोन डंपर करीता देवु केलेले **न्युनतम दरधारक, त्रिमुर्ती क्रेन सर्व्हिस, बाभळेश्वर** यांचे स्टॅडींगसाठी (उभे ठेवणे) दर प्रति दिन (२४ तास) **रु.२९५०/-** मात्र व प्रत्यक्ष वापरासाठीचे प्रति दिन (२४ तास) करीता रु.१९,०००/- मात्र स्विकारणेस व न्युनतमदरधारकांना कुंभमेळा- २०१५ चे आपत्ती व्यवस्थापन विभाग यांना आवश्यकतेनुसार क्रेन, जे.सी.बी. व डंपर इ. वाहने भाडोत्री लावणेबाबत कार्यादेश देणेस व सदर कामी येणा-या अंदाजे रक्कम रु.९,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.२६१** **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, क्रेन, जेसीबी, डंपर इ. वाहने भाडोत्री लावणेकामी प्राप्त झालेल्या दरांचा स्पष्ट बोध नाही, करीता प्रस्तावित निम्नतम दरांबाबतचा तपशीलवार तुलनात्मक तक्ता तयार करणेत येऊन, सदरहू प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, वाहन विभाग)

---

**विषय नं.१२** **श्री.किशोर केशव क्षीरसागर, लिपीक-टंकलेखक यांचे बदलीबाबत.**

**प्रस्ताव-** श्री.किशोर केशव क्षीरसागर, लिपीक-टंकलेखक, मुंबई कार्यालय यांनी दिनांक ०१ एप्रिल, २०१५ च्या अर्जान्वये, "मी संस्थानच्या मुंबई कार्यालय येथे लिपीक-टंकलेखक म्हणून कार्यरत आहे. संस्थान प्रकाशित साईलीला (मराठी) व श्री साईलीला (हिंदी-इंग्रजी) या द्वैमासिकांच्या नवीन सभासदांची संगणकावर नोंद करणे, जुन्या सभासदांचे नुतनीकरण करणे, दुरध्वनी, ई-मेल, टपाल याद्वारे व प्रत्यक्ष संपर्क साधून सदर द्वैमासिकासंबंधी विचारणा करणाऱ्या सभासदांना समर्पक माहिती देणे, त्यांच्या समस्यांचे निवारण करणे, अंक सभासदांना टपालाने पाठविण्याकामी त्यांच्या नोंदींची स्टिकर्स काढणे, टपालासाठी फ्रँकिंग करणे आदि नेमून दिलेल्या मुख्य कामांबरोबरच मी मुंबई कार्यालयातील भक्तांसाठी दर्शन व निवासाकरिता ऑनलाईन बुकींग करणे, पुस्तक-फोटो विक्रीच्या, देणग्यांच्या पावत्या बनविणे, वैद्यकीय आर्थिक मदतीसाठी येणाऱ्या रुग्णांना, त्यांच्या नातेवाईकांना माहिती देणे इत्यादी कामेही करीत असतो.

सदर नियतकालिकांच्या प्रकाशनाकरिता करण्यात येत असलेल्या लेखन-संदर्भशोधन-संपादन-संगणकीय अक्षरजुळणी- मुद्रितशोधन-पृष्ठरचना-आवरणसजावट आदि कामांमध्ये माझा सहभाग बिल्कुल नसतो. मात्र, या कामांत माझा सहभाग असल्याचे समजून, सामान्य प्रशासन विभाग, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडील जा.नं.एसएसएस/ साप्रशा/आस्था/६०२३/२०१५, दिनांक २९ मार्च, २०१५ या आदेशान्वये माझी बदली करण्यात आली आहे. सध्या मुंबई कार्यालयात कार्यरत असलेल्या एकूण ६ कायम कर्मचाऱ्यांपैकी ३ कर्मचारी येत्या ३ ते ६ महिन्यांत सेवानिवृत्त होणार आहेत. त्यामुळे तेथील कामे नीट पार पाडण्यासाठी येथे कर्मचाऱ्यांची नितांत

आवश्यकता आहे. याचबरोबर माझे वडील श्री.केशव पंढरीनाथ क्षीरसागर (वय वर्षे ८४) हे अस्थम्याच्या आजाराने त्रस्त आहेत, तर आई सौ.रजनी केशव क्षीरसागर (वय वर्षे ७४) ही कॅन्सरपीडीत आहे. डॉक्टरांनी तिच्यावर नियमित उपचार करुन घेण्यास सांगितलेले आहे. या दोघांचीही सर्वस्वी जबाबदारी माझ्यावर आहे. तरी कृपया उपरोक्त उल्लेखित बाबींचा सहानुभूतीपूर्वक सर्वकष दृष्टीने विचार करुन मला मुंबई कार्यालयातील कामांसाठी येथेच कार्यरत असू द्यावे," अशी विनंती केलेली आहे.

सदरच्या अर्जासोबत श्री.किशोर क्षीरसागर यांनी डॉ.निर्मल राऊत यांचे सौ.रजनी क्षीरसागर यांच्या आजाराबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले आहे. सदरच्या अर्जावर प्र.अधिक्षक, मुंबई कार्यालय यांनी, "उपरोक्त उल्लेखित माहिती वस्तुस्थितीदर्शक असून, सदर निवेदनाचा कृपया सहानुभूतीपूर्वक व मुंबई कार्यालयातील कामकाज सुरळीत पार पाडण्याच्या दृष्टीने विचार व्हावा," असा अभिप्राय दिलेला आहे.

श्री साईबाबांचे दर्शनासाठी शिर्डी येथे येणाऱ्या साईभक्तांना तात्काळ सेवा-सुविधा पुरविणेकामी मनुष्यबळ कार्यक्षमता पडताळणी करणेकामी दि.२३/१०/२०१४ व दि.०६/१२/२०१४ रोजीचे परिपत्रकान्वये सर्व विभागांना कळवून तपशिलवार माहिती मागविण्यात आलेली होती. त्याकामी मा.कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात दि.०८/११/२०१४ रोजी बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मा.कार्यकारी महोदय यांनी मुंबई कार्यालयाकडील सर्व कर्मचाऱ्यांना पुर्णवेळ वर्कलोड नसलेबाबत तसेच प्रकाशने विभागाकडील दि.०५/११/२०१४ रोजीचे पत्रान्वये साईलीला मासिकाचे कामकाजावर कोणाचेही नियंत्रण नसल्याने मुंबई कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी ०२ लिपीक वर्गीय कर्मचारी, ०१ शिपाई व ०१ स्वच्छता कर्मचारी ठेऊन उर्वरीत सर्व कर्मचारी साईलीलाचे कामासह शिर्डी येथे वर्ग करणेबाबत आदेश दिलेले होते.

मुंबई कार्यालयाकडे ०६ स्थायी व ०४ कंत्राटी असे एकूण १० कर्मचारी कार्यरत आहेत. त्यातील ०३ स्थायी व ०३ कंत्राटी असे एकूण ०६ कर्मचारी शिर्डी येथे वर्ग करणेबाबत तसेच मुंबई कार्यालयाकडील साईलीला द्वैमासिकाचे कामकाज शिर्डी येथे वर्ग करणेबाबत प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८/०२/२०१५ रोजीचे सभेत सादर करण्यात आला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.४३ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"संस्थानचे मुंबई कार्यालयाकडील कर्मचाऱ्यांचे मनुष्यबळ व्यवस्थापनाबाबत सदरहू कार्यालयाच्या गरजेनुसार कार्यकारी अधिकारी यांनी निर्णय घ्यावा," असे ठरले.

त्यानुसार जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/६०२३/२०१५, दिनांक २९ मार्च, २०१५ च्या आदेशाने मुंबई कार्यालयाकडील श्री.सुनिल दत्तात्रय राणे, सहाय्यक संपादक व श्री.किशोर केशव क्षीरसागर, लिपीक-टंकलेखक यांची बदली शिर्डी कार्यालयाकडे करण्यात आलेली आहे. श्री.क्षीरसागर यांनी त्यांच्या अर्जात, सध्या मुंबई कार्यालयात कार्यरत असलेल्या एकूण ६ कायम कर्मचाऱ्यांपैकी ३ कर्मचारी येत्या ३ ते ६ महिन्यांत सेवानिवृत्त होणार आहेत. त्यामुळे तेथील कामे नीट पार पाडण्यासाठी येथे कर्मचाऱ्यांची नितांत आवश्यकता असल्याचे नमुद केलेले आहे. परंतु मुंबई कार्यालयाचे प्र.अधिक्षक श्री.रामचंद्र बाबु दर्गे हे दिनांक ३०/०६/२०१५ रोजी सेवानिवृत्त झाल्यांनतर डिसेंबर २०१५ अखेरपर्यंत तेथील कोणतेही कर्मचारी सेवानिवृत्त होणार नाहीत.

उपरोक्त वस्तूस्थितीनुसार आस्थापना विभागाच्या दिनांक ०८/०४/२०१५ रोजीच्या मंजूर टिपणी अन्वये श्री.क्षीरसागर यांची बदली स्थगित करणेबाबतची विनंती अमान्य करण्यात आली होती व तसे त्यांना जा.नं.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/१८७/२०१५, दिनांक ११ एप्रिल, २०१५ चे पत्रान्वये कळविण्यात आलेले होते.

त्यानंतर श्री.किशोर केशव क्षीरसागर, लिपीक टंकलेखक यांनी संस्थानविरुध्द मा.उच्च न्यायालय, खंडपीठ मुंबई येथे रिट पिटीशन क्र.४१२१/२०१५ ही कोर्ट केस दाखल केलेली आहे. संस्थानने सदर रिट पिटीशनमध्ये रिप्लाय ॲफिडेव्हीट कोर्टात दाखल केलेले आहे. त्यावर दिनांक २१/०७/२०१५ रोजी मा.उच्च न्यायालयाने दिलेले आदेश कामगार विभागाने जा.क्र.एसएसएस/वशी-७ए/१६२०/२०१५, दिनांक ३० जुलै, २०१५ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविलेले आहे.

"श्री.क्षीरसागर यांचे दि.०१/०४/२०१५ रोजीचे अर्जास दि.११/०४/२०१५ रोजीचे पत्राने उत्तर दिले असून त्यांचा अर्ज नामंजुर करणेत आलेबाबत कळविणेत आलेले आहे असे मा.उच्च न्यायालयाचे निदर्शनास आणून दिले आहे. तथापी, मा.उच्च न्यायालयाने श्री.क्षीरसागर यांचा दि.०१/०४/२०१५ रोजीचा अर्ज संस्थानकडे प्रलंबीत असून त्यांचे आईचे कॅन्सरचे आजारपण व इतर संबंधित मुद्दयांचा मा.त्रिसदस्यीय समितीने कायदयानुसार विचार करणे गरजेचे आहे. सदरचे अर्जावर आजपासून सहा आठवडयात मा.त्रिसदस्यीय समितीने लवकरात लवकर निर्णय घ्यावा.

दि.२८/०४/२०१५ रोजीचे स्टेटस को बाबतचा आदेश त्यांचे दि.०१/०४/२०१५ रोजीचे अर्जावर निर्णय होईपर्यंत व त्यानंतर दोन आठवडे लागु राहिल, जर निर्णय तक्रारदाराचे विरोधात असला तर कायदयानुसार तक्रारदारांच्या सर्व विनंत्यांचा विचार करावा," असा आदेश करुन मा.उच्च न्यायालयाने सदर रिट पिटीशन सिव्हील ॲप्लिकेशनसह निकाली काढले आहे.

तरी मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार श्री.किशोर केशव क्षीरसागर, लिपीक टंकलेखक यांचे दि.०१/०४/२०१५ रोजीचे बदलीबाबतचे अर्जावर मा.त्रिसदस्यीय समितीचे सभेत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२६२** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, श्री.किशोर केशव क्षीरसागर, लिपीक टंकलेखक, मुंबई कार्यालय यांचे अर्ज व त्यांचे बाबतीत झालेला मा.उच्च न्यायालयाचा आदेश यासह सदरहू प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, सामान्य प्रशासन)

---

**विषय नं.१३** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे निमित्त वहातूक नियमन करणेसाठी माहितीचे फ्लेक्स बोर्ड तयार करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१) अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२) अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय :-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.०६ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*“.. .. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी. तसेच शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले.”*

**मा.उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश:- Civil Application No.3500/2015 in Public Interest Litigation No.18/2011** वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी देणेत आलेली आहे.

**प्रस्तावना:-** दि.२७ ऑगष्ट २०१५ ते दि.२६ सप्टेंबर २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानाच्या तिथी असल्याने शिर्डी येथे जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयी-सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वर नमूद गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधांमध्ये साई भक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, जड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविणे, तात्पुरत्या स्वरुपाचे निवारा शेडस्, अतिरिक्त दर्शनरांग व्यवस्था, तात्पुरत्या सावर्जनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, पाणीपुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजनव्यवस्था, अल्पोपहार इत्यादी सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणे प्रस्तावित आहे.

सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ चे पर्वणीच्या कालावधीत शिर्डी शहरात मोठया प्रमाणात भक्त येणार असल्याने वाहनांची व भाविकांची प्रचंड गर्दी होणार आहे. सदर गर्दीचे कालावधीत शिर्डी शहरातुन जाणारा नगर – मनमाड राज्य मार्ग शासकीय विश्रामगृह ते श्री साईआश्रम या भागात नो व्हईकल झोन करण्यात आला आहे. सदर रस्त्यास पर्यायी रस्ते नियोजीत केले आहेत. तसेच कुंभमेळा बंदोबस्ताचे कालावधीत ग्रामस्थांसाठी अंतर्गत रस्ते वापरण्याबाबत नियोजित केले असून सदरहू शहरातील रस्त्यांवर वाहने थांबून अडथळा होवू नये म्हणून त्याठिकाणी नो पार्किंग झोन ठरविणेत आले आहेत. याकामी नो पार्किंग, नो इंट्री, बाहयवळण दिशादर्शक व इतर माहितीचे बोर्ड तयार करुन मिळणेबाबत पोलीस निरिक्षक, शिर्डी, यांनी जा.नं.५७७/२०१५ दि.०३/०८/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविले आहे.

याकामी खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | बोर्डाचा तपशिल | साईज | नग | परिमाण/एकक | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | **फ्लेक्स बोर्ड (एम.एस. फ्रेमसह)** | | | | | |
| १ | नो पार्कींग झोन | ३'x२' | १२५ | ७५० चौ.फुट | ३० प्र.चौ.फुट | २२,५००/- |
| २ | डी.जे. व इतर वादय वाजविणेवर बंदी | ५'x४' | ३ | ६० चौ.फुट | | १८००/- |
| ३ | नो इंट्री | ३'x२' | ५० | ३०० चौ.फुट | | ९०००/- |
| ४ | बाहयवळण दिशादर्शक | ३'x२' | ४० | २४० चौ.फुट | | ७२००/- |
| ५ | विना वाहन क्षेत्र | ३'x२' | ५० | ३०० चौ.फुट | | ९०००/- |
| | | | | | एकूण | **४९,५००/-** |

उपरोक्त प्रमाणे सिंहस्थ कुंभमेळा– २०१५ निमित्त शिर्डी येथे होणा-या गर्दीचे नियमनासाठी पोलीस निरिक्षक शिर्डी शहर वाहतुक शाखा, यांनी मागणी केलेप्रमाणे वाहतुकीचे नियमन करणेसाठी नो पार्किंग, नो इंट्री, बाहयवळण दिशादर्शक व इतर माहितीचे बोर्ड तयार कामी अंदाजे रक्कम रु.४९,५००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०१५ निमित्त फ्लेक्स बोर्ड, बॅनर्स तयार करणेकामी रक्कम रु.२,००,०००/- मात्रचे खर्चास मा. त्रिसदस्य समितीचे सभेत मान्यता देण्यात आलेली आहे. उपरोक्त बोर्ड तातडीने तयार करुन घेणे आवश्यक असल्याने याकामी कोटेशन मागवावे लागेल.

तरी नाशिक सिंहस्थ कुंभमेळा २०१५ निमित्त उपरोक्त तपशिलाप्रमाणे फ्लेक्स बोर्ड तयार करुन घेणेकामी येणारे रक्कम रु.४९,५००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२६३ यावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीमध्ये शिर्डीमध्ये होणा-या गर्दीचे पार्श्वभूमीवर वाहतूक नियमन करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे माहितीचे फ्लेक्स बोर्ड तयार करणेकामी विहीत पध्दतीने कोटेशन्स मागविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रु.४९,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१४** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांचे वाहनांचे पार्किंगकरीता मौजे निमगाव को-हाळे गट क्र.१७२ मधील साईधर्मशाळा इमारतीचे उत्तर बाजूकडील मोकळया जागेत वाहनतळ विकसीत करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णय:-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.०६ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*“.. .. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी. तसेच शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले.”*

**मा. उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश:- Civil Application No.3500/2015 in Public Interest Litigation No.18/2011** वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी देणेत आलेली आहे.

**प्रस्तावना :-** दि.२७ ऑगष्ट २०१५ ते दि.२६ सप्टेंबर २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानाच्या तिथी असल्याने शिर्डी येथे जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयी-सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने वर नमूद गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाच्या अतिरिक्त सुविधांमध्ये साई भक्तांच्या वाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, जड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविणे, तात्पुरत्या स्वरुपाचे निवारा शेडस्, अतिरिक्त दर्शनरांग व्यवस्था, तात्पुरत्या सावर्जनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, पाणीपुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजनव्यवस्था, अल्पोपहार इत्यादी सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणे प्रस्तावित आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयान्वये इकडील विभागामार्फत शिर्डी व परिसरात साईभक्तांचे वाहनांकरीता तात्पुरते वाहनतळे विकसीत करणेकामी ई-निविद प्रकीया पूर्ण करून निम्नतम दरधारक मे. एस.के. येवले ॲण्ड कं. संगमनेर यांना पूर्वीचे सात ठिकाणी वाहनतळ विकीसीत करणे कामी इकडील जा.क्र.१८९८/२०१५, दि.०४/०७/२०१५ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मा. उच्च न्यायालय **मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३५००/२०१५** मधील पी.आय.एल. नं.१८/२०११ वर मा. उच्च नयायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रू.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी दिलेली आहे. उपरोक्त मंजुर खर्चा मध्ये ०७ ठिकाणी वाहनतळे विकसीत करणेकामाचा समावेश करण्यात आलेला होता. तदनंतर दि. २४/०६/२०१५ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समिती सभेत वाढीव ०४ ठिकाणी वाहनतळे विकसीत करणेबाबत खालिलप्रमाणे निर्णय क्र. १७२ संमत करणेत आलेला आहे.

*“ नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन -२०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांचे वाहनांसाठी ०४ वाढीव वाहनतळे विकसीत करणे व वाहनतळांच्या जागांकरीता भाडेपट्टा अदा करणेसाठी येणा-या अंदाजे रु. २,३९,२५,७२६/- मात्रचे खर्चास, तसेच सदरहु कामे यापुर्वी ०७ वाहनतळांरीता करण्यात येत असलेल्या ई-निविदा प्रक्रियेव्दारे ठरविण्यात येणा-या ठेकेदारांकडून मंजूर दराने करुन घेणेस चक्रीय पध्दतीने समिती अध्यक्ष व सदस्यांची मान्यता घेण्यात येऊन, त्यावर कार्यवाही चालू करण्यात आलेली आहे, त्याची नोंद घेण्यात आली.”*

मा. विभागीय आयुक्त नाशिक, मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर, मा. पोलीस अधिक्षक, अहमदनगर व मा. कार्यकारी अधिकारी यांनी दि.०१/०८/२०१५ रोजी शिर्डी येथे कुंभमेळयासाठी विकसीत करण्यात येत असलेल्या वाहनतळांना भेट देवून प्रत्यक्ष पहाणी केली. त्यावेळी वरील मान्यवरांनी मौजे निमगाव को-हाळे येथिल संस्थान

मालकीचे गट नं. १७२ मधील साईधर्मशाळा इमारतीचे उत्तरबाजू कडील मोकळया जागेत वाहनतळ विकसीत करणेबाबत सूचना केली आहे. तसेच वाहनतळ क्र. ०३ येथे जास्त गर्दीचे वेळी अतिरिक्त वाहनतळ म्हणून वापरासाठी शेवटच्या टप्प्यात(सुमारे ०२ एकर जागेत मुरुमीकरण) करावे अशी सूचना करणेत आली.

पुर्वी मंजूर करण्यात आलेल्या ०७ ठिकाणी वाहनतळे विकसीत करणेकामी ठेकेदार मे. एस. के. येवले ॲण्ड कं. संगमनेर यांना कार्यादेश देण्यात आलेला असून सदरहू वाहनतळांची कामे सध्या प्रगतीत आहेत. सदर निम्नतम दरानुसार ज्या वाहनतळांचे कामासाठी निविदा मागविणेत आल्या ती ०७ वाहनतळे व अतिरिक्त ०४ वाहनतळे विकसीत करणे, तसेच वर नमूद सुचनेप्रमाणे मौजे निमगांव को-हाळे येथिल गट क्र. १७२ मधील साई धर्मशाळा इमारतीचे उत्तरबाजूचे मोकळया जागेत वाहनतळ विकसीत करणेसाठी येणा-या अपेक्षित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.न. | कामाचा तपशिल | अंदाजपत्रकीय रक्कम रु. | निविदा - टक्केवारी | रक्कम रु. | गौणखनिज रॉयल्टी रु. | एकूण रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | यापुर्वी मंजूर असलेल्या ०७ ठिकाणी वाहनतळे विकसीत करणे. | ५,६८,७०,६४२/- | -३१.७७% कमी | ३,८८,०२,८३९/- | ६४,८२,४३५/- | ४,५२,८५,२७४/- |
| २ | अतिरिक्त ०४ ठिकाणी वाहनतळे विकसीत करणे. | ८७,८२,८१७/- | -३१.७७% कमी | ५९,९२,५१६/- | १२,२२,९१७/- | ७२,१५,४३३/- |
| ३. | गट क्र. १७२ साईधर्मशाळा इमारतीचे उत्तर बाजूकडील मोकळ्या जागेत वाहनतळ विकसीत करणे. | ४०,४५,६९६/- | -३१.७७% कमी | २७,६०,३७८/- | ४,६७,५६६/- | ३२,२७,९४४/- |
| | | | एकूण अपेक्षित खर्चः- | ४,७५,५५,७३३/- | ८१,७२,९१८/- | ५,५७,२८,६५१/- |

कुंभमेळा कालावधीत होणा-या गर्दीचे अनुषंगाने उपलब्ध करावयाच्या सोयी-सुविधांकरीता मा.उच्च न्यायालयाने रु.५७.५४ कोटी मात्रचे खर्चाचे प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. त्यापैकी रू.६,३३,५३,०७६/- मात्र इतकी रक्कम वाहनतळ विकसीत करण्याचे कामासाठी मंजूर आहे. वर नमूद केलेप्रमाणे गट नं. १७२ मधिल अतिरिक्त वाहनतळासह एकुण १२ वाहनतळे विकसीत करणेसाठी ठेकेदार मे.एस. के. येवले ॲण्ड कं. संगमनेर यांचे निम्नतम निविदा दरानुसार येणारा एकुण रुपये ५,५७,२८,६५१/- मात्र हा खर्च यापुर्वीचे मंजूर रकमेच्या मर्यादेत आहे.

तरी मौजे निमगांव को-हाळे येथिल संस्थनाचे गट क्र. १७२ मधील साईधर्मशाळा इमारतीचे उत्तर बाजूकडील मोकळया जागेत वाहनतळ विकसीत करणेचे कामासाठी गौणखनिज रॉयल्टी रकमेसह येणारे रु.३२,२७,९४४/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती. तसेच सदरहु काम ठेकेदार मे. एस. के. येवले ॲण्ड कं. संगमनेर यांचेकडून मंजूर दराने करणेकामी त्यांना कार्यादेश देणेसाठी सदरहु प्रस्तावास मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२६४ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांच्या वाहनांचे पार्किंगकरीता मौजे निमगाव को-हाळे गट क्र.१७२ मधील साईधर्मशाळा इमारतीचे उत्तर बाजूकडील मोकळया जागेचे सपाटीकरण करणेत येऊन, तेथे एक फिरते शौचालय व पिण्याच्या पाण्याच्या दोन टाक्या ठेवण्यात याव्यात. तसेच याकामी प्रत्यक्षात येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.१५ **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत भक्तांच्या सुविधेकरीता संस्थानचे श्री साईप्रसादालयातून बाहेर जाणेसाठी पश्चिमेकडील शेतीमहामंडळ मालकीचे क्षेत्रातून तात्पुरत्या स्वरुपात पत्राशेड मंडपासह मार्ग विकसीत करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद –**

| अ.नं. | कलम / तरतुद क्रमांक | कलम / तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतुद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १४ | समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये | २ (घ) | **भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.** |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्थापाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहुन,**समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते अधिकार असतील.** |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (ग) | **भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी** व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी **सोयी व सुविधा पुरविणे.** |

**मा.त्रिसदस्य समिती सभा दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजीचा निर्णय क्र.०६" ....** उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधिल शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाहयवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी. तसेच शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले."

**मा उच्च न्यायालयाचे आदेश-** पी.आय.एल.१८/२०११ मधील सिव्हील अर्ज क्रं. १२०५६/२०१२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१६/१०/२०१२ रोजीचे आदेशान्वये मा. उच्च न्यायालयाचे पूर्वपरवानगी शिवाय समितीने मोठया स्वरुपाचे आर्थिक निर्णय घेऊ नयेत असे निर्देश दिलेले आहेत.

मा. मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी पी.आय.एल. क्र. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नंबर ३५००/२०१५ मध्ये दिनांक ०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये सिंहस्थ कुंभमेळा २०१५ करीता रुपये ५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता दिलेली आहे.

**प्रस्तावना–** संन २०१५ चे कुंभमेळा कालावधीत साधारणतः २७ ऑगस्ट, २०१५ ते २६ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानांच्या तिथी असल्याने जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरीक्त सोयीसुविधा विशेषतः सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, (विशेषतः महिलासाठी) पाणी पुरवठा, सुरक्षा, अतिरीक्त प्रसाद भोजन व्यवस्था, अल्पोहार इत्यादी, सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणेत आलेले आहेत.

श्री साईप्रसादालयात भोजन घेणेसाठी जातात. परंतू प्रसाद भोजन घेतल्यानंतर साईभक्त उत्तर बाजूचे गेट मधून बाहेर पडून पुन्हा प्रसादालयाचे पश्चिम बाजुने दक्षिणेकडील मुख्य रस्त्यास येतात. त्यामुळे सदरहू परिसरात भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी होते. दि.१५ ऑगस्ट, २०१५ रोजी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर, पोलीस अधिक्षक, अहमदनगर तसेच इतर खात्यांचे अधिकारी/पदाधिकारी यांनी साईप्रसादालय परिसराची पहाणी केली असता सिंहस्थ कुंभमेळा २०१५ चे कालावधीत साईभक्तांची मोठ्या प्रमाणात प्रसाद भोजन घेणेसाठी गर्दी होणार आहे. त्यामुळे प्रसाद भोजनासाठी आलेल्या व प्रसाद भोजन घेऊन झाल्यानंतर बाहेर जाणा-या साईभक्तांची गर्दी एकत्र होऊ नये याकरीता श्री साई प्रसादालयाचे दक्षिणेकडील टॉयलेट ब्लॉक जवळून १५ फुट रुंदीची कंपाऊंड भिंत तोडून लगतचे शेतीमहामंडळाचे मालकीचे जागेतून दक्षिण उत्तर असा १८ फुट रुंदीचा मुरुम टाकून रस्ता विकसीत करणे तसेच सदरहू रस्त्यावर साईभक्तांचे उन, वारा, पाऊस यापासून रक्षण होणेकामी सदरहू रस्त्यावर मंडप टाकणेबाबत सूचना दिल्या आहे.

**प्रस्ताव-** वरील प्रमाणे साईभक्तांचे सुविधेसाठी साईप्रसादालयाचे पश्चिमेकडून मुरुम टाकून रस्ता विकसीत करणेचे काम कुंभमेळा कालावधीत पार्कींग विकसीत करणेचे ठेकेदार मे. एस.के.येवले ॲण्ड कंपनी संगमनेर यांचेकडून त्यांचे मंजूर दराने करुन घेता येईल तसेच मंडप उभारणीचे काम ठेकेदार मे. लल्लुजी ॲण्ड सन्स, अहमदाबाद यांचे मंजूर दरात करुन घेता येईल. याकामी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशिल | खर्च |
|---|---|---|
| ०१ | साईप्रसादालयाचे पश्चिमबाजून ८२० फुट लांब व १८ फुट रुंदीचा मुरुम टाकूण् रस्ता विकसीत करणे | १,४५,०००/- |
| ०२ | साईप्रसादालयाचे पश्चिमबाजूनकडून करण्यात येणा-या रस्त्यावर ८२० फुट लांब व १८ फुट रुंदीचा पत्रा शेड मंडप उभारणे कलावधी -३० दिवस | १०,६५,०००/- |
| ०३ | महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या. यांचेकडे वापर मुल्य अदा करणे. | १५,०००/- |
| | **एकूण रुपये** | **१२,२५,०००/-** |

मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी पी.आय.एल. क्र. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नंबर ३५००/२०१५ मध्ये दिनांक ०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये सिंहस्थ कुंभमेळा २०१५ करीता रुपये ५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता दिलेली आहे. उपरोक्तकामी येणारा खर्च हा सदरहू मंजूर रक्कमेतून होणा-या संभाव्य बचतीतून करता येईल.

तरी श्री साईप्रसादालयाचे पश्चिम बाजून मरुम टाकून रस्ता तयार करणेसाठी तसेच त्यावर मंडप उभारणीसाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये १२,२५,०००/- मात्रचे खर्चास तसेच त्यापैकी रस्त्याचे काम ठेकेदार मे. एस.के. येवले, ॲण्ड कं., संगमनेर यांचेकडून व पत्राशेडचे काम मे. लल्लुजी ॲण्ड सन्स, अहमदाबार यांचेकडून त्यांचे मंजूर दरात करुन घेणेस मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव मा.त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर होणेस विनंती.

**निर्णय क्र.२६५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत भक्तांच्या सुविधेकरीता संस्थानचे श्री साईप्रसादालयातून बाहेर जाणेसाठी पश्चिमेकडील शेतीमहामंडळ मालकीचे क्षेत्रातून तात्पुरत्या स्वरुपात पत्राशेड मंडपासह मार्ग विकसीत करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावांस व त्याकामी येणा-या रु.१२,२५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू खर्च मा.उच्च न्यायालयाने कुंभमेळयासाठी मंजूरी दिलेल्या रकमेमधून करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१६** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे साईभक्तांचे सोयींसाठी रेल्वे स्थानकांचे २० आर जागेमध्ये निवारा मंडप व प्रसाधनगृहाची व्यवस्था करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूदः-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्थापाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समिती निर्णयः-** मा. व्यवस्थापन समितीचे दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.०६ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*“.. .. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी. तसेच शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले.”*

**मा.उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेशः-Civil Application No.3500/2015 in Public Interest Litigation No.18/2011** वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी देणेत आलेली आहे.

**प्रस्तावनाः-** दि.२७ऑगष्ट २०१५ ते दि.२६ सप्टेंबर २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानाच्या तिथी असल्याने शिर्डी येथे जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयी-सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने वर नमूद गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाच्याअतिरिक्त सुविधांमध्ये साईभक्तांच्यावाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, जड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविणे, तात्पुरत्या स्वरुपाचे निवारा शेडस्, अतिरिक्त दर्शनरांग व्यवस्था, तात्पुरत्या सावर्जनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, पाणीपुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजनव्यवस्था, अल्पोपहार इत्यादी सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणे प्रस्तावित आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयान्वये इकडील विभागामार्फत शिर्डी व परिसरात साईभक्तांचे वाहनांकरीता तात्पुरते वाहनतळे विकसीत करणेकामी ई-निविद प्रकीया पूर्ण करून निम्नतम दरधारक मे. एस.के. येवले अॅण्ड कं. संगमनेर यांना पूर्वीचे सात ठिकाणी वाहनतळ विकीसीत करणे कामी इकडील जा.क्र.१८९८/२०१५ दि.०४/०७/२०१५ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या सिव्हील अॅप्लीकेशन नं. ३५००/२०१५ मधील पी.आय.एल. नं.१८/२०११ वर मा. उच्च नयायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रू.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी दिलेली आहे. उपरोक्त मंजुर खर्चा मध्ये ०७ ठिकाणी वाहनतळे विकसीत करणेकामाचा समावेश करण्यात आलेला होता. तदनंतर दि. २४/०६/२०१५ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समिती सभेत वाढीव ०४ ठिकाणी वाहनतळे विकसीत करणेबाबत खालिलप्रमाणे निर्णय क्र. १७२ संमत करणेत आलेला आहे.

*“ नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन -२०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांचे वाहनांसाठी ०४ वाढीव वाहनतळे विकसीत करणे व वाहनतळांच्या जागांकरीता भाडेपट्टा अदा करणेसाठी येणा-या अंदाजे रु. २,३९,२५,७२६/- मात्रचे खर्चास, तसेच सदरहु कामे यापुर्वी ०७ वाहनतळांरीता करण्यात येत असलेल्या ई-निविदा प्रक्रियेव्दारे ठरविण्यात येणा-या ठेकेदारांकडून मंजूर दराने करुन घेणेस चक्रीय पध्दतीने समिती अध्यक्ष व सदस्यांची मान्यता घेण्यात येऊन, त्यावर कार्यवाही चालू करण्यात आलेली आहे.*

वरील ०४ वाढीव वाहनतळांपैकी साईनगर रेल्वे स्टेशनवर रेल्वेने येणारे साईभक्तांचे सोयींसाठी रेल्वे स्थानकाचे जागेमध्ये (क्षेत्र २० आर.) निवारा मंडप शेड व स्त्री व पुरुषांसाठी स्वतंत्र प्रसाधनगृहाची सुविधा करणेसाठी

जागेची मागणी करणेत आली होती. त्यास अनुसरुन, वरिष्ठ विभागीय अभियंता, सेंट्रल रेल्वे, सोलापूर यांनी त्यांचेकडील दिनांक १०/०८/२०१५ रोजीचे पत्राने, रेल्वे बोर्डाचे नियमानुसार क्रीडा व सांस्कृतीक व इतर कार्यक्रमांसाठी १५ दिवसांकरीता जागा तात्पुरते देणेबाबतचे अधिकार DRM यांना आहेत. यासाठी आवश्यक असलेल्या क्षेत्राचा नकाशा व प्रचलित पध्दतीने जागेचा भाडे दर यासह प्रस्ताव ADEN Ahmednagar यांचेकडे पाठवून त्यांच्या प्रमाणपत्रासह सदरचा प्रस्ताव DRM यांचेकडे पाठविणेबाबत कळविले आहे.

सदरहू क्षेत्रामध्ये रेल्वेने येणारे साईभक्तांचे सोयीसाठी दि.२७ऑगष्ट २०१५ ते दि.२६ सप्टेंबर २०१५ या ३० दिवसाचे कालावधीत तात्पुरते स्वरुपाचे निवारा शेड व प्रसाधनगृह व्यवस्था करणेसाठी खालील तपशिलानुसार खर्च अपेक्षीत आहे.

| अ.नं. | कामाचा तपशिल | अंदाजे खर्च (एकुण ३० दिवसांसाठी) |
|---|---|---|
| ०१. | एकुण २० आर क्षेत्रात मुरुम टाकून लेव्हलींग व रोलींग करणे. | ५१९२६७/- |
| ०२. | तात्पुरते निवाव्यवस्थेसाठी पत्राशेड मंडप उभारणे. | ६९७३९५/- |
| ०३. | जमिनीचे भाडे -०.५२५ एकर x ९०००/-प्रति ३० दिवस | ४७,२८७/- |
| ०४. | साईभक्तांचे सोयीसाठी तात्पुरते स्वरुपासाठी प्रसाधनगृहाची व्यवस्था करणे. | १,२६,०००/- |
| | एकुण रुपये | १३,८९,९४९/- |
| ०५. | रॉयल्टी | ४३,८०८/- |
| | एकुण अंदाजे खर्च रुपये. | १४,३३,७५७/- |

वरील प्रमाणेचे काम करणेपूर्वी रेल्वे स्थानकाची जागा तात्पुरते स्वरुपाचे वापरासाठी दि.२७ऑगष्ट २०१५ ते दि.२६ सप्टेंबर २०१५ या ३० दिवसाचे कालावधीत अधिग्रहीत करणेसाठी तहसिलदार, राहाता यांचेमार्फत रेल्वेकडे प्रस्ताव सादर करुन ADEN Ahmednagar यांचेमार्फत सादर करुन जागेचा ताबा घेणेबाबत कार्यवाही करता येईल. ट्रॉली माउंटेड फायबर टॉयलेट ब्लॉक खरेदी करणे प्रस्तावीत आहे. सदरहु टॉयलेट ब्लॉक खरेदी झाल्यास उपरोक्त खर्चात प्रसाधनगृहासाठी करण्यात आलेली रु.१,२६,०००/- मात्रचे खर्चाची तरतुद रद्द करता येईल. सदरचे क्षेत्र ताब्यात मिळालेनंतर वर नमूद केलेल्या कामांपैकी अ.नं.१ चे काम ठेकेदार मे. एस. के. येवले, संगमनेर यांचेकडून तसेच अ.नं.०२ चे काम मे. लल्लुजी अॅण्ड सन्स, अहमदाबाद व अ.नं.०४ चे काम याकामी नेमण्यात येणा-या ठेकेदाराकडून त्यांचे मंजूर दराने करुन घेणेस व याकामी येणारे अंदाजे रु.१४,३३,७५७/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.२६६** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे साईभक्तांचे सोयींसाठी रेल्वे स्थानकांचे २० आर जागेमध्ये निवारा मंडप व प्रसाधनगृहाची व्यवस्था करणेसाठी सदरहू जागा अधिग्रहीत करणेकामी रेल्वे प्रशासनाकडून परवानगी मिळणेस बराच कालावधी लागणार असल्यामुळे सध्या तेथे भक्तांच्या सोयीसाठी फक्त फिरते शौचालय व पिण्याच्या पाण्यासाठी ०२ टाक्या ठेवण्यात याव्या.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१७** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ चे कालावधीत भक्तांच्या सुविधेकरीता विविध ठिकाणी उभे करणेसाठी फिरते शौचालय खरेदी करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद –**

| अ. नं. | कलम/ तरतुद क्रमांक | कलम / तरतुदीचे शीर्षक | पोटकलम/ उपकलम क्रमांक | तरतुद |
|---|---|---|---|---|
| ०१ | १४ | समितीच्या अधिका-यांचे अधिकार व कर्तव्ये | २ (घ) | **भक्तांच्या सुरक्षिततेसाठी किंवा सोयीसाठी आवश्यक ते तातडीचे दुरुस्तीचे काम किंवा उपाययोजना हाती घेणे.** |
| ०२ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | १ | राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्थापाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, **भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे** आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे,—ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील. |
| ०३ | १७ | समितीची कर्तव्ये व अधिकार | ६ | या अधिनियमाच्या तरतुदीस अधीन राहुन, **समितीला या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक ते अधिकार असतील.** |
| ०४ | २१ | विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग | १ (ग) | **भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी** व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी **सोयी व सुविधा पुरविणे.** |

**मा.उच्च न्यायालयाचे आदेश-** पी.आय.एल.१८/२०११ मधील सिव्हील अर्ज क्र. १२०५६/२०१२ मध्ये मा. उच्च न्यायालयाने दि.१६/१०/२०१२ रोजीचे आदेशान्वये मा.उच्च न्यायालयाचे पूर्वपरवानगी शिवाय समितीने मोठया स्वरुपाचे आर्थिक निर्णय घेऊ नयेत असे निर्देश दिलेले आहेत.

मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी पी.आय.एल.-क्र. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नंबर ३५००/२०१५ मध्ये दिनांक ०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये सिंहस्थ कुंभमेळा २०१५ करीता रुपये ५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता दिलेली आहे.

**प्रस्तावना–** सन २०१५ चे कुंभमेळा कालावधीत साधारणतः २७ ऑगस्ट, २०१५ ते २६ सप्टेंबर, २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानाच्या तिंथी असल्याने जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरीक्त सोयीसुविधा विशेषतः सार्वजनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, (विशेषतः महिलासाठी) पाणी पुरवठा, सुरक्षा, अतिरीक्त प्रसाद भोजन व्यवस्था, अल्पोहार इत्यादी, सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणे प्रस्तावति आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये होणा-या श्री साईबाबा महासमाधि शताब्दी महोत्सवाचे कालावधीत होणारे संभाव्य गर्दीचे अनुषंगाने करावयाचे सोयी-सुविधांचे नियोजन करणेत येत आहे.

सुलभ इंटरनॅशनल सोशल सर्व्हिस ऑर्गनायझेशन, महाराष्ट्र राज्य, मुंबई शाखेने दि.२७/११/२०१४ रोजीचे पत्रानुसार शिर्डी येथे भक्तांच्या सोईसुविधेसाठी स्वच्छता गृहे व स्नानगृहे उभारणेकामी प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.त्रिसदस्य समितीचे दि.३०/०१/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.०५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

"उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५-१६ मध्ये शिर्डी येथे होणा-या संभाव्य गर्दीचे अनुषंगाने शौचालय बांधकाम करणेसाठी विधी व न्याय-विभाग, महाराष्ट्र शासन आणि मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यास तत्वतः मान्यता घेण्यात आली. त्यासाठी समिती सदस्यांची संयुक्तिक पहाणी करुन संबंधीत परीसराच्या उपलब्धतेनुसार तीन ठिकाणी जागा निश्चित कराव्यात, असे ठरले."

उपरोक्त निर्णयानुसार दि.२६.०४.२०१५ रोजी मा.व्यवस्थापन समितीचे मा.अध्यक्ष तथा प्रधान जिल्हा सत्र न्यायाधीश, अहमदनगर,मा.सदस्य तथा जिल्हाधिकारी, अहमदनगर तसेच मा.सदस्य तथा कार्यकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी खालील तीन जागांची पहाणी करुन त्यांना मान्यता दिलेली आहे.

०१. श्री साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) समोरील नगर-मनमाड रस्त्यालगत पुर्व बाजूचे मोकळया जागेत.

०२. शिर्डी शहरातील बसस्थानकासमोरील (पूर्वीचे स्वागतकक्ष) जागेत.

०३. जुने प्रसादालयाचे उत्तरेकडील मोकळया जागेत (साईप्रसाद निवासस्थाने परिसरात).

उपरोक्त ठिकाणी शौचालयाचे बांधकाम करणेकरीता नकाशे व अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन याकामी जिल्हा दर सुची २०१४-१५ नुसार शौचालयाचे बांधकामासाठी येणारे प्रत्येकी रक्कम रु.९,७०,१९२/- मात्रचे खर्चास व याकामी वर्तमान पत्रातील जाहीरातीव्दारे ई- निविदा मागविणेस मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांची चक्रीय पध्दतीने मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार याकामासाठी इकडील विभागाचे दि.०५/०८/२०१५ रोजीचे टिपणी अन्वये शौचालयाचे बांधकाम करणेसाठी ई- निवीदा सुचना प्रसिध्द करणेस मान्यता मिळालेली आहे. ई- निवीदा प्रक्रिया करुन शौचालयाचे बांधकाम करणे यासाठी किमान ०४ महिन्याचा कालावधी लागेल. त्यामुळे कुंभमेळा कालावधीत साईभक्तांची गैरसोय होऊ नये यासाठी उपरोक्त परीसरात व इतर ठिकाणी Six Seater Mobile Toilet Van खरेदी करुन उपलब्ध करुन देणेबाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी सिंहस्थ कुंभमेळा आढावा बैठकीत सूचना दिल्या आहेत.

दि.१५ ऑगस्ट,२०१५ रोजी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे उपस्थितीत शिर्डी येथे मा.कार्यकारी अधिकारी, मा. उपविभागीय अधिकारी व मा. उपकार्यकारी अधिकारी यांची सिंहस्थ कुंभमेळयाबाबत आढावा बैठक झाली. सदर बैठकीत Mobile Toilet Van पुरवठा करणारे त्यांचे प्रतिनीधी उपस्थित होते. पुरवठादार न्यु साई फायबर, मिरज यांचे केंद्रीय भांडर विभागाचे क्र. RCNO. KB/ GNR /DM /Liquid waste / 2015-16/ 1000000007795468108/ D.T.10-02-2015 दि. ३१/०२/२०१६ अन्वये Six Seater Mobile Toilet Van पुरवठा करणेसाठी रु.४,९०,०००/- मात्र प्रति नग दर मंजूर आहेत. यावर सदर पुरवठादार यांचेशी वरील बैठकीत चर्चा करणेत येऊन दरात सवलत देणेबाबत विचारणा करणेत आली. त्यावर पुरवठादार यांनी त्यांचे दि.१६/०८/२०१५ रोजीचे पत्रान्वये Six Seater Mobile Toilet Van करीता रु.३,९०,०००/- मात्र प्रति नग प्रमाणे दर देऊ केले. ई-निविदा प्रक्रिया राबविणेसाठी पुरेसा कालावधी उपलब्ध नसल्याने याप्रमाणे सवलतीचे दरात १० नग मोबाईल टॉयलेट व्हॅन खरेदी करणेस हरकत नाही अशी चर्चा वर नमूद बैठकीत झाली आहे.

Six Seater Mobile Toilet Van १० नग खरेदी करणेसाठी वर नमूद दराने रु.३९,००,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सिंहस्थ कुंभमेळा २०१५ कालावधीत साईभक्तांकरीता करावयाचे सोयी-सुविधेसाठी मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी पी.आय.एल. क्र. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नंबर ३५००/२०१५ मध्ये दिनांक ०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये सिंहस्थ कुंभमेळा २०१५ करीता रुपये ५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता दिलेली आहे. त्यामध्ये होणा-या संभाव्य बचतीतून वर नमूद रु.३९,००,०००/- मात्र हा अपेक्षित खर्च करता येईल.

तरी वरीलप्रमाणे मोबाईल टॉयलेट व्हॅन खरेदी बाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.२६७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा-२०१५ चे कालावधीत भक्तांच्या सुविधेकरीता विविध ठिकाणी उभे करणेसाठी फिरते शौचालय खरेदी करणेबाबतच्या उपरोक्त प्रस्तावास व त्याकामी येणा-या रु.३९,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू खर्च मा.उच्च न्यायालयाने कुंभमेळयासाठी मंजूरी दिलेल्या रकमेमधून करणेत यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१८** **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात नियोजीत वाहनतळांवर साईभक्तांचे सोयीसाठी पोर्टेबल टॉयलेट व युरिनल्स भाडेतत्वावर घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२६८** **सदरहू प्रस्तावामध्ये परिपूर्ण माहिती नसल्यामुळे तो सविस्तर माहितीसह पुढील सभेमध्ये ठेवण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

**विषय नं.१९** **मौजे निमगाव को-हाळे हद्दीतील चर रस्त्याची (नगर-मनमाड रस्ता- साईप्रसाद हौसिंग सोसायटी पर्यंत) दुरुस्ती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम, 2004 मधिल तरतूदः-** *"...17. (1) राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान प्रथेनुसार धार्मिक विधी पुजाअर्चा समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करून देणे आणि अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालववयाचा आहे उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे ही समितीची कर्तव्ये असतील.*

*(2) विशेषकरून आणि पोटकलम (1) मधील तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता समिती- (झ) सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे* व्यवस्थापन देखभाल व प्रशासन करण्याचे प्रयोजनासाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील."

**मा.व्यवस्थापन समिती निर्णय-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय दि.27/04/2013 रोजीचे सभेतील नि.क्र. 360 अन्वये मौजे निमगाव को-हाळे हद्दीतील चर रस्ता (नगर मनमाड रस्ता ते गोदावरी उजवा कालवा गट नं. 221 व 245 पर्यंतच्या रस्त्याचे मजबुतीकरणासह डांबरीकरण करणेस मान्यता देणेत आली आहे. तसेच सदरहु रस्ता ज्या विभागाचे अखत्यारीत आहे त्यांची परवानगी घेवून शासनास प्रस्ताव पाठवावा असे ठरले आहे.

**प्रस्तावनाः-** उपरोक्त निर्णयानुसार सदरहु रस्ता पाटबंधारे विभागाच्या अखत्यारीत असल्याने विषयांकीत रस्त्याचे काम संस्थान निधीतून करणेसाठी कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग यांना जा.नं. 1373/2013 दि.24/07/2014 चे परवानगी मागणी करण्यात आली होती. कार्यकारी अभियंता, नाशिक पाटबंधारे विभाग यांनी दि.24/09/2014 रोजीचे पत्राने सहा अटींचे अधीन राहून ना-हरकत दाखला दिला होता. त्यातील अट क्र.05 नुसार सदर काम जलसंपदा विभागामार्फत या विभागाकडून संस्थान निधीतून डिपॉझिट ठेव तत्वावर करण्यात येईल. यासाठीचा निधी संस्थानने या विभागाकडे वर्ग करावा असे कळविले आहे. करिता पाटबंधारे विभागाकडून काम करून घ्यावे अथवा यापुर्वी सन 2009 मध्ये संस्थान निधीतून सदरहु काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करणेत आलेले असल्याने सदरहु काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करावे याबाबतचे प्रस्तावावर मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय दि.08/01/2014 रोजीचे सभेत खालीलप्रमाणे निर्णय क्र.11 खालीप्रमाणे संमत झालेला आहे.

*"...मौजे निमगाव को-हाळे हद्दीतील चर रस्ता (नगर मनमाड रस्ता ते गोदावरी उजवा कालवा गट नं. 221 व 245 पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण कोणामार्फत करून घ्यायचे याबाबत संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येवून मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे मार्गदर्शन घ्यावे व त्यानंतर फेरप्रस्ताव सभेपुढे सादर करणेत यावा असे ठरले."*

उपरोक्त निर्णयानुसार मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे मार्गदर्शन घेणेकामी सिव्हिल अर्ज दाखल करणेस संस्थान वकील श्री. संजय आर. चौकीदार औरंगाबाद यांना दि.10/04/2014 व दि. 12/08/2014 रोजीचे पत्राने कळविण्यात आले आहे. अद्याप सदरहु बाबीवर मा. उच्च न्यायालयाचे मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही. याकामी कालावधी लागणार आहे.

नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन 2015 मध्ये दिनांक 27 ऑगष्ट 2015 ते 16 सप्टेंबर 2015 या कालावधीत मागील कुंभमेळयाच्या गर्दीचा विचार करता यावर्षीही प्रचंड गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे यावेळी सिंहस्थ कुंभमेळा कालावधीमधिल पर्वणीचे दिवशी, तसेच त्या अगोदर व नंतरचे दिवशी शिर्डीमध्ये येणा-या भाविकांची संख्या मोठया प्रमाणावर वाढण्याची शक्यता आहे. सिंहस्थ कुंभमेळयातील महत्वाचे दिवस पुढिलप्रमाणे आहेत–

| | | |
|---|---|---|
| मुख्य ध्वजारोहन समारंभ | - | 14/07/2015 |
| आखाडयांचे ध्वजारोहन | - | 19/08/2015 |
| पहिले शाही स्नान | - | 29/08/2015 |
| दुसरे शाही स्नान | - | 13/09/2015 |
| तिसरे शाही स्नान | - | 18/09/2015 |
| त्र्यंबकेश्वर शाही स्नान | - | 25/09/2015 |

पर्वणीचे दिनांकाचा विचार करता साधारणपणे दिनांक २७ ऑगष्ट २०१५ ते २६ सप्टेंबर २०१५ या कालावधीमध्ये मोठया प्रमाणावर भाविक शिर्डी येथे येतिल, असा अंदाज आहे.

जा. नं. एसएसएसटी/ वशी-काअ/1657/2015 दि. 03 ऑगस्ट, 2015 अन्वये, साई धर्मशाळेकरीता तयार करण्यात येत असलेल्या वाहनतळावर हायवेकडून येणा-या रस्त्यासाठी तो रस्ता वाहतुक योग्य करणेसाठी या रस्त्याचे काम त्वरीत हाती घेणेबाबत निर्देशित करणेत आले आहे.

साई धर्मशाळेकडे जाणेसाठी नगर-मनमाड रस्ता ते साईप्रसाद हौसींग सोसायटीकडे जाणा-या रस्त्याचा साईभक्त वापर करत असल्याने, तसेच साईप्रसाद हौसिंग सोसायटीचे दक्षिणेकडील भागात संस्थानची कर्मचारी निवासस्थाने असलेल्या सदनिका आहेत. सदरचे भागात संस्थान वाहनांची ये-जा सुरु असते. या रस्त्यावरुन संस्थानचे व इतर स्कुल बसेसची ये-जा सुरु असते. तसेच सध्या कुंभमेळा कालावधी सुरु असल्याने पर्वणीच्या काळात व इतर वेळीही उपरोक्त निवासस्थाने व साईआश्रम धर्मशाळेकडे जाणारे वाहनांची रहदारी या रस्त्यावरून वाढणार असल्याने रहदारीचे नियंत्रणासाठी तुर्त नगर मनमाड रस्ता- साईप्रसाद हौसिंग सोसायटी या सुमारे 518 मी. लांबीचे रस्त्यांचे दुरुस्तीचे काम उपरोक्त निर्देशानुसार तातडीने करणे आवश्यक आहे.

**प्रस्ताव:-** मा. विभागीय आयुक्त, मा. जिल्हाधिकारी, मा. जिल्हा पोलीस अधिक्षक यांनी दि.01/08/2015 रोजी शिर्डी येथिल पहाणी दरम्यान सदर रस्त्याची दुरुस्ती करुन घेणेबाबत सूचना दिलेली आहे.

करीता तुर्तास सदरचे रस्त्याचे या भागातील खड्डे डब्लु बी. एम. करुन भरुन रस्ता वाहतुकीयोग्य करता येईल त्यासाठी रु.56,525/- खर्च अपेक्षित आहे.

सदरचा रस्ता साई धर्मशाळेकरीता तयार करण्यात येत असलेल्या वाहनतळावर हायवेकडून येणा-या वाहनांसाठी वापरात आहे. कुंभमेळा कालावधीतील कामांसाठी Civil Application No. 3500/2015 in the public interest Litigation No.18/2011 वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.06/05/2015 रोजी दिलेल्या आदेशान्वये रु.57,54,80,000/- मात्रचे खर्चास परवानगी देणेत आली आहे. करिता सदरचे मंजूर रकमेपैकी शिल्लक राहणा-या निधीतून सदर काम करून घेता येईल.

विषयांकीत रस्त्याचे दुरूस्तीचे काम कुभमेळा पर्वणीपूर्वी तातडीने पुर्ण करावयाचे असल्याने, सदरहु काम संस्थानमार्फत वाहनतळे विकसित करणे कामाचे ठेकेदार एस. के. येवले, संगमनेर यांचेकडून इकडील जा. क्र. 1898/2015 दि. 04 जूलै, 2015 रोजीचे कार्यादेशातील मंजूर दराने करून घेणेस व याकामी येणारे रु.56,525/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस विनंती.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

निर्णय क्र.२६९ **यावर सविस्तर चर्चा होऊन, मौजे निमगाव को-हाळे हद्दीतील चर रस्ता (नगर-मनमाड रस्ता- साईप्रसाद हौसिंग सोसायटी पर्यंत) दुरुस्तीचे काम कुभमेळा पर्वणीपूर्वी तातडीने पुर्ण करावयाचे असल्याने, सदरहु काम संस्थानमार्फत वाहनतळे विकसित करणे कामाचे ठेकेदार एस.के.येवले, संगमनेर यांचेकडून मंजूर दराने करून घेणेस व याकामी येणारे रु.५६,५२५/- मात्रचे खर्चास मान्यता मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू काम मा.उच्च न्यायालयाने कुंभमेळयासाठी मंजूरी दिलेल्या रकमेपैकी शिल्लक राहणा-या निधीतून करुन घेणेत यावे, असे ठरले.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२० **सिंहस्थ कुंभमेळा -२०१५ कालावधीतील कचरा टाकणेकामी खड्डा खोदणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,) शिर्डी (अधिनियम – २००४ मधिल तरतूद:-**

अधिनियमाच्या कलम २१ मधिल पोटकलम )१ (च्या खंड) क (अन्वये "मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन करणे" या प्रयोजनासाठी विश्वस्तव्यवस्थेचा निधी समितीकडून खर्च करण्याची तरतूद आहे .

**मा. त्रिसदस्य समितीचे दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.०६-** *" .. .. उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन २०१५ निमीत्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरीक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व तयासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वतः मान्यता देण्यात आली. याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी. व मा. खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी.*

*तसेच शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले."*

**मा. उच्च न्यायालयाचे आदेश:-** प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने पी.आ.एल. क्र. १८/२०११ मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं.३५००/२०१५ मध्ये दि.०६/०५/२०१५ रोजी मा.न्यायालयाने आदेश करुन रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता दिली आहे.

**प्रस्तावना:** - आरोग्य विभागाने त्यांचे दि.०७/०७/२०१५ रोजीचे पत्रात नमूद केलेप्रमाणे सिंहस्थ कुंभमेळा २०१५ कालावधीत साईभक्तांची मोठया प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता असल्याने सदर कालावधीत निघणारा कचरा टाकण्यासाठी सर्वे नं.१८२ मधील सध्या असलेल्या खड्डयाचे बाजूला १००x६० मापाचा १५ फुट खोल खड्डा खोदून देणेबाबत कळविले आहे .

प्रस्ताव- सिंहस्थ कुंभमेळा कालावधीत होणा-या गर्दीचे अनुषंगाने उपलब्ध करावयाच्या सोयी-सुविधांकरीता मा. उच्च न्यायालयाने रु.५७.५४ कोटी मात्र खर्चाचे प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. कुंभमेळा कालावधीत निघणारा कचरा टाकणेसाठी आवश्यक असलेला नवीन खड्डा खोदणेचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेता येईल. याकामी रक्कम रु.२,९५,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदरचा खर्च सिंहस्थ कुंभमेळा -२०१५ चे मंजूर रकमेतून करता येईल.

तरी विषयांकीत काम करणेकामी येणारे रक्कम रु.२,९५,०००/- मात्रचे खर्चास व याकामी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२७० **यावर सविस्तर चर्चा होऊन, सिंहस्थ कुंभमेळा- २०१५ चे कालावधीतील कचरा टाकणेकामी खड्डा खोदणेसाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.२,९५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदरहू खर्च मा.उच्च न्यायालयाने कुंभमेळयासाठी मंजूरी दिलेल्या रकमेमधून करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२१ **नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांचे वाहनांचे पार्कीगकरीता मौजे शिर्डी येथील गट १०५/१/२/२ पैकी मधील क्षेत्रामध्ये वाहनतळाची व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेबाबत.**

प्रस्ताव- **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद :-**

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोट कलम (१) अन्वये,राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधीन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्थापाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोट कलम १ (ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

**मा. व्यवस्थापन समितीनिर्णय:**-मा. व्यवस्थापन समितीचे दि.३० जानेवारी, २०१५ रोजीचे सभेत निर्णय क्र.०६ खालीलप्रमाणे संमत करणेत आलेला आहे.

*"... उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन-२०१५ निमित्ताने संस्थानतर्फे शिर्डी व शिर्डी परिसरात साईभक्तांसाठी अतिरिक्त सुविधा करणेसाठी प्रस्तावित कामांमधील शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेचे काम वगळून इतर कामे विहीत कार्यपध्दतीने करुन घेणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली. याकामी येणा-या खर्चास संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा.खंडपीठाच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत यावी. तसेच शिर्डी व राहाता या शहरांबाहेरुन जाणारा नगर-मनमाड दुपदरी बाह्यवळण रस्ता विकसीत करणेबाबत समिती प्रत्यक्ष आढावा घेऊन निर्णय देईल, असे ठरले."*

**मा.उच्च न्यायालय खंडपीठ परवानगी आदेश:-Civil Application No.3500/2015 in Public Interest Litigation No.18/2011** वर मा. उच्च न्यायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रु.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी देणेत आलेली आहे.

**प्रस्तावना:**- दि.२७ऑगष्ट २०१५ ते दि.२६ सप्टेंबर २०१५ या कालावधीत मुख्य शाही स्नानाच्या तिथी असल्याने शिर्डी येथे जास्तीत जास्त गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यासाठी शिर्डी व परिसरात साईभक्तांकरीता अतिरिक्त सोयी-सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने वर नमूद गर्दीचे कालावधीत भक्तांसाठी करावयाच्याअतिरिक्त सुविधांमध्ये साईभक्तांच्यावाहनांसाठी वाहनतळे तयार करणे, जड वाहतूक बाह्यवळण रस्त्याने वळविणे, तात्पुरत्या स्वरुपाचे निवारा शेडस्, अतिरिक्त दर्शनरांग व्यवस्था, तात्पुरत्या सावर्जनिक स्वच्छतागृहांची व्यवस्था, पाणीपुरवठा, सुरक्षा, अतिरिक्त प्रसाद भोजनव्यवस्था, अल्पोपहार इत्यादी सोयी-सुविधा संस्थानतर्फे करणे प्रस्तावित आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयान्वये इकडील विभागामार्फत शिर्डी व परिसरात साईभक्तांचे वाहनांकरीता तात्पुरते वाहनतळे विकसीत करणेकामी ई-निविद प्रकीया पूर्ण करून निम्नतम दरधारक मे. एस.के. येवले ॲण्ड कं. संगमनेर यांना पूर्वीचे सात ठिकाणी वाहनतळ विकीसीत करणे कामी इकडील जा.क्र.१८९८/२०१५ दि.०४/०७/२०१५ अन्वये कार्यादेश देण्यात आलेला आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद येथे दाखल केलेल्या सिव्हील ॲप्लीकेशन नं. ३५००/२०१५ मधील पी.आय.एल. नं.१८/२०११ वर मा. उच्च नयायालय यांनी दि.०६/०५/२०१५ रोजी दिलेल्या आदेशान्वये रू.५७,५४,८०,०००/- मात्रचे खर्चास परवानगी दिलेली आहे. उपरोक्त मंजुर खर्चा मध्ये ०७ ठिकाणी वाहनतळे विकसीत करणेकामाचा समावेश करण्यात आलेला होता. तदनंतर दि. २४/०६/२०१५ रोजी झालेल्या मा. त्रिसदस्य समिती सभेत वाढीव ०४ ठिकाणी वाहनतळे विकसीत करणेबाबत खालिलप्रमाणे निर्णय क्र. १७२ संमत करणेत आलेला आहे.

*" नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन -२०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे शिर्डी व परिसरात साईभक्तांचे वाहनांसाठी ०४ वाढीव वाहनतळे विकसीत करणे व वाहनतळांच्या जागांकरीता भाडेपट्टा अदा करणेसाठी येणा-या अंदाजे रु.२,३९,२५,७२६/- मात्रचे खर्चास, तसेच सदरहु कामे यापुर्वी ०७ वाहनतळांरीता करण्यात येत असलेल्या ई-निविदा प्रक्रियेव्दारे ठरविण्यात येणा-या ठेकेदांराकडून मंजूर दराने करुन घेणेस चक्रीय पध्दतीने समिती अध्यक्ष व सदस्यांची मान्यता घेण्यात येऊन, त्यावर कार्यवाही चालू करण्यात आलेली आहे.*

दिनांक २३/०७/२०१५ रोजी मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर तथा सदस्य व मा. पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांनी दिलेल्या भेटीमध्ये साईप्रसाद प्रॅापर्टीज लि., येथून अंतर्गत वाहतूकीसाठी येणा-या बस/ प्रीप्रेड रिक्षांकरीता शिर्डी येथील साई आश्रम भक्तनिवासचे दक्षिण बाजू जवळील क्षेत्रामध्ये तात्पुरते स्वरुपात थांबा तयार करण्यात यावा असे निर्देश देण्यात आले. त्यास अनुसरुन मौजे शिर्डी येथील श्री. यादव बाबुराव कोते यांनी त्यांचे गट क्र. १०५/१/२/२ पैकी मधील क्षेत्र विनामोबदला देणेबाबत सहमती दर्शविली असून, सदरचे क्षेत्र अधिग्रहीत करणेबाबत मा.तहसिलदार, राहाता यांना दि.१४/०८/२०१५ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. सदरची कार्यवाही त्यांचेमार्फत सुरु आहे.

करीता सदरचे क्षेत्रामध्ये कुंभमेळा सन २०१५ निमीत्त दि. २७/०८/२०१५ ते दि.२६/०९/२०१५ या कालाधीकरीता अंतर्गत वाहतूकीसाठी येणा-या बस/ प्रीप्रेड रिक्षा थांबा यासाठी सदरचे क्षेत्रामध्ये मुरुम टाकुण लेव्हल करणे, निवारा शेड उभारणे, पुरुष व स्त्रीयांसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह इत्यादी व्यवस्था करणेसाठी रक्कम रु.४,२५,००००/- खर्च अपेक्षीत आहे.

तरी विषयांकीत कामासाठी येणारे अंदाजे रु.४,२५,०००/- मात्रचे खर्चास व सदरहू कामे ही मंजूर दराचे ठेकेदार यांचेकडून करुन घेणेस मान्यता मिळणेस विनंती.

निर्णय क्र.२७१ **यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, नाशिक सिंहस्थ कुंभमेळा सन- २०१५ चे कालावधीत संस्थानतर्फे साईभक्तांच्या वाहनांचे पार्कींगकरीता मौजे शिर्डी येथील गट १०५/१/२/२ पैकी मधील क्षेत्रामध्ये वाहनतळ व इतर अनुषंगिक व्यवस्था करणेकामी सदरहू जागेची प्रत्यक्ष पाहणी करणेत येऊन, निर्णय घेतला जाईल. याकरीता सदरहू प्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा.** (कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

---

विषय नं.२२ **दि.०९.०८.२०१५ रोजी संस्थानचे दोन्ही रुग्णालयासाठी वैद्यकिय अधिक्षक व इतर ३७ पदांसाठी घेणेत आलेल्या मुलाखतीचे बंद पाकिट उघडणेबाबत.**

निर्णय क्र.२७२ वेळेअभावी सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली. (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

वरील निर्णय क्र.२५१ ते २७२ सर्वानुमते घेण्यात आला.

यानंतर रात्रौ ०९.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरित/-xxx | स्वाक्षरित/- xxx | स्वाक्षरित/- xxx |
| (राजेंद्र जाधव) | (अनिल कवडे) | (विनय जोशी) |
| कार्यकारी अधिकारी | जिल्हाधिकारी, अहमदनगर | मुख्य जिल्हा न्यायाधीश |
| सदस्य | सदस्य | अध्यक्ष |

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी